गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
**महावीर पेन्शन ठेव योजना**
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १० (६+४) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १८.१०.२०२५ | अंक नं. १६८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
**मे. हरी बाकाजी देडगांवकर**
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
डबल फायदा
\+ जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*

आज **धनत्रयोदशी** शुभमुहूर्त सुवर्णखरेदीचा..
**चंदुकाका ज्वेल्स**
सोनेरी नातं..
चांदीचे दर शुध्दतेनुसार

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*


## •।। पाचवे श्रध्दासुमन ।।•



### स्व. संजयकुमार कचरदासजी छाजेड

स्व. दि. १८/१०/२०२०

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्याआठवणी आमच्या मनात..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण सुमनांजली..

शोकाकुल

श्रीमती स्नेहल । चि. निर्मल
श्री. दर्शन व सौ. प्रतिक्षा दर्शन छाजेड
श्री राजकुमार । अशोककुमार । डॉ. ईश्वरकुमार । किशोरकुमार । मनोजकुमार
**छाजेड परिवार** अहिल्यानगर-पुणे
श्री आनंदकुमारजी कांतीलालजी खिंवसरा व परिवार-सिन्नर (नासिक)
श्री संतोषकुमारजी शुभमकुमारजी दुधेडिया व परिवार-हडपसर (पुणे)


भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर परिमल भारतवासी
तसेच मोमेन्टस, इंडियन कस्तुरी, केशर चंदन, खस (वाळा), ब्लु बर्ड, यात्रा, पिंकलोटस, हिना कस्तुरी, शाहीऊद, महालक्ष्मी, शुभलाभ (६ ईन १ पाऊच रु.६० चा ५० मध्ये)
अगरबत्ती चे जिल्हा वितरक व कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, होलसेल व रिटेल साठी
**केवल अगरबत्ती** हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
तसेच ३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

दर्जेदार व माफक दरात
**फ्लेक्स प्रिंटींग**
9403232323


## १२ वे पुण्यस्मरण



### स्व. सचिन अर्जुनराव दाणे

स्व.१८.१०.२०१३

आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात, सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली

**दादा ट्रान्सपोर्ट मित्र मंडळ**
आहिल्यानगर




**पेशवाई | श्रीमंत**
सर्जेपुरा, अहिल्या नगर. 0241 2325002/3/4 | कुमठेकर रस्ता, पुणे. 020 24453730 / 24430150
शॉपिंग वर फ्री शॉपिंग
₹12,000 ₹2,000 | ₹18,000 ₹3,000 | ₹24,000 ₹4,000
₹30,000 ₹5,000 | ₹36,000 ₹6,000 | ₹42,000 ₹7,000
₹48,000 ₹8,000 | ₹54,000 ₹9,000 | ₹60,000 ₹10,000
*T&C Apply
फ्री शॉपिंग फक्त रेडिमेड सूटिंग, शर्टिंग करिता.
ऑफर फक्त सर्जेपुरा, अहिल्यानगर शोरुम मध्ये लागू.
/peshwaishrimant | www.peshwaishrimant.com
* पैठणी * पारंपारिक साड्या * डिझायनर साड्या * घागरा * एथेनिक * ब्रँडेड रेडीमेड्स * सूटिंग * शर्टिंग * ॲक्सेसरीज








# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १० (६+४) | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १८.१०.२०२५ | अंक नं. १६८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







ना गिफ्टची लालच... ना लकी ड्रॉची भुरळ ! फायदा हा सर्व ग्राहकांचाच !
धनत्रयोदशी

| १० ग्राम | वजन |
|---|---|
| ₹.१,१९,२३० | २२ कॅरेट सोने दर |
| ६.९ % | मजुरी |
| ३ % | G.S.T. |
| ₹.१,३१,२८०/- | एकूण रक्कम |

DATE - 18/10/2025
TIME - 01:30 PM
मजुरी ६.९%
मे. शिंगवी ज्वेलर्स
- सोने, चांदी व रत्ने -
हत्ती चौक, सर्जेपुरा, अहिल्यानगर
९७८७५७७७००१







# माजी आमदारांच्या शेतात केले अतिक्रमण

## कर्मचाऱ्यांना शिवीगाळ दमदाटी करत पैशांची मागणी, गुन्हा दाखल

नगर - माजी आमदारांच्या शेताची संरक्षक भिंत तोडून अनाधिकाराने शेतात प्रवेश करत पाल ठोकून अतिक्रमण केल्याची घटना नगर तालुक्यातील पोखर्डी गावच्या शिवारात घडली आहे. याबाबत विचारणा करायला गेलेल्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, दमदाटी करत पैशांची मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणी ३ ते ४ अनोळखी महिलांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माजी आमदार नरेंद्र मारुतराव घुले (वय ६५, रा. दहीगावने, ता.शेवगाव) यांनी फिर्याद दिली आहे. घुले यांची पोखर्डी गावच्या शिवारात शेतजमीन आहे. या शेतजमिनीला त्यांनी संरक्षण भिंतही बांधलेली आहे. काही अनोळखी व्यक्तींनी ती संरक्षण भीत एका ठिकाणी फोडून शेतात अनाधिकाराने प्रवेश करत तेथे दोन पाल ठोकत त्या ठिकाणी राहात आहेत. ही बाब त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी त्या ठिकाणी असलेल्या महिलांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी कर्मचाऱ्यांना शिवीगाळ दमदाटी करत पैशांची मागणी केली. पैसे दिल्या शिवाय आम्ही येथून जाणार नाही असे त्या महिला म्हणाल्या.

ही बाब कर्मचाऱ्यांनी घुले यांना सांगितली. त्यानंतर घुले यांनी १६ ऑक्टोबर रोजी तेथे जावून पाहणी केली आणि १७ ऑक्टोबर रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अनोळखी ३ ते ४ महिलांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३३, ३२४ (४), ३५२, ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मोबाईल टॉवर कर्मचारी करणार 'काम बंद' आंदोलन

## महाराष्ट्रभर मोबाईल नेटवर्कवर परिणाम होण्याची शक्यता

नगर - पगारवाढ व सुट्यांचे वेतन २० ऑक्टोबरपर्यंत देण्यात यावे अन्यथा कामबंद आंदोलन करण्यात येईल, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात मोबाईल नेटवर्कवर परिणाम होवू शकतो, असा इशारा महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर टेक्निकल एम्प्लॉइज असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे. राज्यातील सर्व मोबाईल टॉवर तांत्रिक कर्मचाऱ्यांनी एकमुखाने पगार वाढ, बोनस आणि सुट्ट्यांच्या मोबदल्याची मागणी केली आहे.

मराठवाडा विभागातील १० जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या आयडिया कंपनीची इन्फास्ट्रक्चर कंपनी, अल्टीअस, पीटीपीएल अशा विविध कंपन्यांतील टॉवर तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी पुण्यातील लेबर कमिशनर यांच्या *(पुढील मजकूर व छायाचित्र पान २ वर)*



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पैसे मागितल्याने डोक्यात फरशी घालून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न

नगर – कामाचे पैसे मागितल्याने त्याचा राग येवून एकाने हुज्जत घालत शिवीगाळ केली. तसेच तेथे असलेली फरशी डोक्यात घालून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना अरणगाव रोड वरील इंदिरानगर येथे १७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या मारहाणीत रवि रमेश निकाळजे (रा. इंदिरानगर, अरणगाव रोड) हे जखमी झाले आहेत.

याबाबत श्रीमती शलाका भीमा निकाळजे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जखमी रवि निकाळजे यांनी समीर लुकमान शेख (रा. इंदिरानगर) यांच्याकडे १७ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.१५ वाजण्याच्या सुमारास जावून कामाचे पैसे मागितले. त्याचा समीर शेख यास राग आला व त्याने रवि निकाळजे यांच्याशी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. नंतर शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

शिवीगाळ, मारहाण का करतो असे म्हणाल्यावर समीर याने तेथे पडलेली फरशी उचलली आणि थांब तुला मारूनच टाकतो असे म्हणत ती फरशी रवि निकाळजे यांच्या डोक्यात घातली. त्यामुळे त्यांना मोठी दुखापत झाली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी समीर शेख याच्या विरुद्ध बीएनएस कलम १०९ (१), ११५ (२), ३५१ (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मोबाईल टॉवर कर्मचारी करणार 'काम बंद' आंदोलन

(पान १ वरुन)

अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत कंपनीचे वरिष्ठ अधिकारी व असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र चर्चेनंतरही वेतनवाढीबाबत ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. संघटनेचे अध्यक्ष सदाशिव खेडेकर, उपाध्यक्ष किशोर साठवणे, सचिव समीर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड. श्रीरंग गिते, सोपान शिंदे, रवी काकडे, बाबासाहेब गायकवाड, शामसुंदर जाधव, अश्फाक शेख, नारायण पाटील, किरण निकम यांनी सांगितले की, मागील काही महिन्यांपासून कर्मचाऱ्यांना योग्य वेतनवाढ दिलेली नाही. उलट वाढत्या कामाच्या ताणामुळे आणि महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना दरमहा मिळणाऱ्या पेमेंटमध्ये ५०० ते ६००० रुपयांपर्यंत कपात करण्यात आली आहे. हे अत्यंत अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, वर्ष २०२५ मधील सर्व लिव्ह (सुट्टी) व नॅशनल हॉलिडेजचे सुमारे ११ हजार ४०० इतके पेमेंट अद्याप कर्मचाऱ्यांना दिले गेलेले नाही. ही थकबाकी सोमवारपर्यंत अदा न केल्यास, राज्यभरातील सर्व मोबाईल टॉवर कर्मचाऱ्यांकडून काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.



महाराष्ट्र राज्य मोबाईल टॉवर टेक्निकल एम्प्लॉइज असोसिएशनच्यावतीने राज्यातील सर्व मोबाईल टॉवर तांत्रिक कर्मचाऱ्यांची पगार वाढ, बोनस आणि सुट्ट्यांच्या मोबदल्याच्या मागणीसाठी बैठक झाली.

संघटनेच्या मते, पुणे लेबर कमिशनर यांच्या हस्तक्षेपानंतर देखील कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. त्यामुळे आता असोसिएशनकडून संघटितपणे सर्व जिल्ह्यांमध्ये आंदोलन छेडले जाणार आहे. या आंदोलनाचा परिणाम अहिल्यानगर, जळगाव, जालना, बीड, हिंगोली, लातूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, नांदेड अशा जिल्ह्यांतील मोबाईल नेटवर्कवर होऊ शकतो, असा इशारा संघटनेने दिला आहे.

शेवटी असोसिएशनने नमूद केले की, आमच्या मागण्या न्याय्य असून, कर्मचाऱ्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळेपर्यंत आंदोलन तीव्र करण्यात येईल. कंपनीने लवकरात लवकर थकबाकी व पेमेंटवाढ अमलात आणावी, अन्यथा महाराष्ट्रभर मोबाईल नेटवर्कवर परिणाम होणार असल्याचे पत्रकार परिषदेमध्ये म्हटले आहे.

# केडगावमध्ये २ तरुणांवर खुनी हल्ला; सहा जणांवर गुन्हा दाखल

नगर – ४ – ५ दिवसांपूर्वी चेष्टा मस्करीत झालेल्या भांडणाबाबत मनधरणी करायला गेलेल्या २ तरुणांना ६ जणांनी लोखंडी हत्याराने बेदम मारहाण करत त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना केडगाव उपनगरातील माधवनगर, शाहूनगर येथे १७ ऑक्टोबर रोजी घडली. या मारहाणीत अनिल बाबुराव सुरवसे (वय २४, रा. ओंकारनगर, शाहूनगर केडगाव) व ओंकार मनोज निलफराके हे दोघे जखमी झाले आहेत.

याबाबत अनिल सुरवसे याने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अनिल याचे साहिल समीर पठाण याच्याशी ४ – ५ दिवसांपूर्वी चेष्टा मस्करीत भांडण झाले होते. ते मिटवण्यासाठी आणि मनधरणी करण्यासाठी अनिल व ओंकार हे माधवनगर येथे साहिल याच्या घरी गेले होते. त्यावेळी साहिल याने घरासमोर अनिल यास जोरजोरात ओरडत ढकलून दिले. तेव्हा ओंकार हा त्याला अडविण्यासाठी गेला असता साहिल याने मोठ्याने हाका मारत त्याच्या कुटुंबियांना बोलावले.

त्याच्या कुटुंबातील सोहेल समीर पठाण, रिजवाना समीर पठाण, समीर इस्माईल पठाण, यास्मिन सलीम पठाण, चोंडया उर्फ सलीम पठाण हे हातात लोखंडी हत्यारे घेवून बाहेर धावत आले व त्यांनी अनिल आणि ओंकार या दोघांना बेदम मारहाण केली. दोघांच्याही मांडीवर, पाठीवर, डोक्यात मारहाण केल्याने दोघे जखमी झाले आणि जीव वाचविण्यासाठी तेथून पळून गेले. असे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी ६ जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०९ (१), १८९ (२), १९०, १९१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये २५ ऑक्टोबर रोजी मत माऊली यात्रेचे आयोजन

नगर – सालाबादा प्रमाणे संत आन्ना चर्च, कलेक्टर ऑफिस जवळ, अहिल्यानगर येथे २५ ऑक्टोबर रोजी जुन्या पवित्र मरीया, मत माउली यात्रेचे आयोजन केलेले आहे.

सदर यात्रेच्या निमित्ताने पवित्र मरीयेची संगीतमय पवित्र रोझरीची प्रार्थना सायंकाळी ५ वाजता अहमदनगर बॉइज हायस्कुल, अहिल्यानगर मैदानापासुन मिरवणुकीने सुरू होईल व त्यानंतर सायंकाळी ६ वाजता सणाचा संगीतमय मिस्सा होणार असून सदरच्या पवित्र मिस्साचे मुख्य याजक कॅथोलिक नाशिक धर्मग्रामाचे महागुरू स्वामी बिशप बार्थोल बरेटो हे आहेत. पवित्र मिस्सानंतर रात्री ८:०० ते १०:०० दरम्यान स्तुती संध्या हा धार्मिक गीताचा व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. मत माऊली यात्रा निमित्ताने आरोग्यदानाची भव्य प्रार्थना, २१, २२ व २३ ऑक्टोबर रोजी पवित्र मिस्सा सायंकाळी ५.३० वाजता व नंतर आरोग्यदानाची प्रार्थना सायंकाळी ६.३० वाजता होईल. उपदेशक फादर बेन्नी जोसेफ (एम. एस. टी), असतील.

पवित्र मरीयेच्या सन्मानार्थ सर्व भाविकांनी यात्रेच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन संत अन्ना धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फादर मेकेन्रो लोपीस यानी केलेले आहे.

# नगर शहरामध्ये ३ व ४ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन

नगर – युवकांचा सर्वांगीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणे यासाठी प्रतिवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. राज्यात सन २०२५–२६ या वर्षातील युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्यावतीने ३ व ४ नोव्हेंबर या कालावधीत जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन न्यू आर्ट्स्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील राजश्री शाहू सभागृह या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहे.

**युवा महोत्सवामधील स्पर्धात्मक बाबी –** अ.क्र.१ – सांस्कृतिक – स्पर्धा : लोकनृत्य (गट), लोकगीत (गट्) सहभाग संख्या – १०, तपशील – लोकनृत्य व लोकगीत यामध्ये निर्धारित संख्येमध्ये वाद्यवृंद संख्या अंतर्भूत राहील.

अ.क्र.२ – कौशल्य विकास – स्पर्धा : कथा लेखन : सहभाग संख्या : ३

स्पर्धा : चित्रकला : २ : विषय – नशामुक्त युवा किंवा युवकांसाठी आरोग्यदायी जीवनशैली

स्पर्धा : वक्तृत्व : सहभाग संख्या : विषय : १. भारतातील आणीबाणीचा काळ आणि संविधानाचे उल्लंघन

२. लोकशाही व लोकशाही मूल्यांचे संरक्षण (हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सादरीकरण)

स्पर्धा : कविता : सहभाग संख्या : ३

नवोप्रकम ट्रॅक : विज्ञान प्रदर्शन : सहभाग संख्या – प्रत्येक संघात ५ – विषय : जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, अक्षय ऊर्जा, पर्यावरण संवर्धन, आरोग्य तंत्रज्ञान, डिजीटल उपाययोजना इ.

या स्पर्धेमध्ये सहभागासाठी १५ ते २९ वयोगटातील (दि. १२ जानेवारी २०२६ या दिनांक रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी) युवक व युवती यांना प्रवेश देण्यात येईल तसेच स्पर्धेमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना रोख पारीतोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल व विभागीय, राज्य तसेच राष्ट्रीय युवा मोहोत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. सदर युवा महोत्सवामध्ये जिल्ह्यातील

कृषि महाविद्यालये, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, महिला मंडळ तसेच १५ ते २९ वयोगटातील युवांनी गुगल फॉर्म लिंक द्वारे ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आपला सहभाग नोंदवावा. जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdwZtISFhCetli9MqFh4q3dXqPUXv8t0u3wbTGZI XWOXAQ/viewfom?usp=header

# उत्पादकांच्या चुकीचा फटका किरकोळ केमिस्टांना

**एआयओसीडी आणि एमएससीडीएचा महाराष्ट्र एफडीएवर आरोप; दूषित सिरपमुळे मृत्यू, पण केमिस्टांना शिक्षा! अन्यायकारक कारवाईविरोधात औषध विक्रेत्यांचा संताप**

नगर – मध्यप्रदेश आणि राजस्थानमधील दूषित खोकल्याच्या सिरपमुळे मृत्यू झालेल्या २० मुलांच्या घटनेने देशभरात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील औषध प्रशासन विभागाने (एफडीए) किरकोळ केमिस्टांवर केलेल्या कठोर कारवाईबाबत ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स ण्ड ड्रगिस्ट्स (एआयओसीडी) व महाराष्ट्र स्टेट केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशन (एमएससीडीए) यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी दिली.



दोन्ही संघटनांनी म्हटले आहे की, उत्पादक कंपन्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या मृत्यूंचा अन्यायाने फटका निर्दोष किरकोळ केमिस्टांना बसत आहे, ही बाब अत्यंत खेदजनक आणि अन्यायकारक आहे. या दुर्दैवी घटनेची प्राथमिक चौकशी सांगते की, संबंधित सिरपमध्ये औद्योगिक दर्जाच्या ग्लिसरीनमध्ये असलेले डाय–इथिलीन ग्लायकॉल हे विषारी रसायन होते. हे रसायन सिरपमध्ये गोडवा आणण्यासाठी वापरले गेले, परंतु त्याचा वापर फक्त औद्योगिक उपयोगासाठीच परवानगी असलेला आहे.

संघटनांनी सांगितले की, हे पहिल्यांदाच घडलेले नाही; १९३७ साली अमेरिकेत, तसेच अलीकडे गॅम्बियामध्येही अशाच दूषित घटकांमुळे मृत्यू झाले. औषधाच्या गुणवत्तेची जबाबदारी उत्पादकावरच असते, केमिस्टवर नव्हे. गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेस, गुड लॅबोरेटरी प्रॅक्टिसेस आणि क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टीमचे पालन करणे आवश्यक आहे. औषध उत्पादनातील चूक ही उत्पादकांची आहे; किरकोळ विक्रेते फक्त पुरवठादार आहेत.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी डीसीजीआयने मुलांना खोकल्याचे सिरप देऊ नये, अशी सूचना जारी केली. ही माहिती अद्याप सर्व केमिस्टांपर्यंत पोहोचली नव्हती, तोवर एफडीएने दुसऱ्याच दिवशी औषधी दुकाने तपासायला सुरुवात केली आणि किरकोळ कारणावरून परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची मोहीम चालवली. ही कारवाई अनैसर्गिक आणि अन्यायकारक आहे. एका अधिकाऱ्याच्या पेनच्या एका ओळीतून केमिस्टांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येतो. उत्पादकांची चूक असूनही केमिस्टांना गुन्हेगारफ ठरवले जात आहे, ही बाब असह्य आहे, असे संघटनांचे मत आहे.

संघटनांनी राज्य सरकार आणि एफडीए आयुक्तांचे लक्ष वेधून दिले की, ऑनलाइन फार्मसीद्वारे अवैध विक्री सुरू असून, काही डॉक्टरांकडे मोठ्या प्रमाणात औषध साठा असूनही त्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई होत नाही. वेदना, खोकला, सर्दी यांसारख्या औषधांच्या जाहिराती टीव्ही, प्रिंट आणि सोशल मीडियावर खुलेआम चालतात. रुग्ण थेट केमिस्टकडे येतात, आणि काही वेळा आपत्कालीन परिस्थितीत केमिस्ट मदतीच्या हेतूने औषध देतात. पण त्याच कृतीचा वापर करून त्यांचे परवाने रद्द केले जातात. हे अन्यायकारक आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

एआयओसीडी आणि एमएससीडीए यांनी ही बाब आम्ही राज्य सरकार, एफडीए आयुक्त आणि डीसीजीआय यांच्या निदर्शनास आणली आहे. खरी जबाबदारी उत्पादन करणाऱ्या कंपनीची आहे; किरकोळ विक्रेत्यांवर अन्याय थांबवावा. संघटनांनी औषध नियंत्रण विभागाला अधिक वास्तववादी, समन्वयात्मक आणि न्याय्य दृष्टिकोन ठेवण्याची विनंती केली आहे. दूषित औषध निर्मात्यांवर कठोर कारवाई करावी, मात्र नियमांचे पालन करणाऱ्या किरकोळ केमिस्टांना वाचवावे, जेणेकरून रुग्णसेवेत कार्यरत असलेला हा व्यवसाय टिकून राहणार असल्याचे म्हंटले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी ८४६ कोटी ९६ लाखांची मदत

**दिवाळीपूर्वी खात्यात निधी वर्ग करण्याच्या सूचना : पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील**



नगर – सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे जिल्ह्यातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांना एकूण ८४६ कोटी ९६ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा निर्णय घेतला आहे. दिवाळीपूर्वी ही मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील विविध भागांतील शेतीपिकांचे नुकसान झाले असून, जिल्ह्यात सुमारे ६ लाख हेक्टर क्षेत्रावर या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम झाला होता. या अनुषंगाने महसूल आणि कृषी विभागांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची आकडेवारी व मदतीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

राज्यातील सर्व बाधित जिल्ह्यांतील परिस्थितीचा आढावा घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत एकूण ३ हजार २५८ कोटी ५६ लाख रुपयांच्या मदतीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार अहिल्यानगर जिल्ह्यास ८४६ कोटी ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, या निधीचा लाभ जिल्ह्यातील ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांना मिळणार आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

मदतीचा निधी वितरित करताना शासनाच्या नियम व निकषांचे काटेकोर पालन करण्याच्या, नैसर्गिक आपत्ती संदर्भातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या तसेच लाभार्थ्यांची यादी आणि मदतीचा तपशील जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

# १७ वर्षीय युवतीची गळफास घेत आत्महत्या

नगर – १२ च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या युवतीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील सारोळा कासार शिवारात राघोबा मळा येथे १७ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. वैष्णवी देविदास जाधव (वय १७) असे मयत युवतीचे नाव आहे.



वैष्णवी जाधव (मयत)

वैष्णवी हिने घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर तिचे महेश अशोक जाधव यांनी तिला रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील मेडिकल ऑफिसर यांनी तिला तपासून ती उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मयत वैष्णवी हिच्या पश्चात आई, वडील, १ भाऊ असा परिवार आहे.

# सुलोचनाबाई मुंडके यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गुलमोहोर रोड वरील नरहरीनगर येथील रहिवासी श्रीमती सुलोचनाबाई पंढरीनाथ मुंडके (वय ९०) यांचे १८ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रेसिडेन्सीअल हायस्कुलचे सेवानिवृत्त प्राचार्य अविनाश व अनिल मुंडके यांच्या त्या मातोश्री होत.

# स्टेट बँक चौक ते जुने कलेक्टर ऑफिसपर्यंतच्या रस्त्याचे काम रखडले

**नागरिकांसह व्यापारी त्रस्त, कामाला गती देण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी**

नगर – नगर शहरातील स्टेट बँक चौक, पोस्ट ऑफिस जवळून ते जुने कलेक्टर ऑफिस,बाबा बंगाली परिसरापर्यंतचा मुख्य रस्ता गेल्या तीन महिन्यांपासून म हापालिकेने खोदून ठेवलेला आहे. या ठिकाणी रस्त्याचे काम सुरू असून ते अतिशय संथ गतीने करण्यात येत आहे. परिणामी नागरिकांबरोबरच व्यापाऱ्यांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या भागात पोस्ट ऑफिस, हॉस्पिटल आणि जुन्रने कलेक्टर ऑफिस, पालकमंत्र्यांचे संपर्क कार्यालय असल्याने दिवसभर नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्याचे काम अपूर्ण राहिल्यामुळे सर्वत्र चिखल, खड्डे आणि अडथळे निर्माण झाले आहेत. पावसामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून, नागरिकांना पायी चालणे अवघड झाले आहे. रस्त्यावरील असमतोल आणि खोल खड्ड्यांमुळे अनेक नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याशिवाय, ड्रेनेजचे पाणी परिसरातील व्यापाऱ्यांच्या दुकानांसमोर साचत असल्याने व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे. दुकानासमोरच घाण पाणी येत असल्याने ग्राहकांची ये–जा कमी झाली असून, अनेक व्यवसायिकांचे व्यवहार ठप्प झाले आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे.



स्टेट बँक चौक ते जुने कलेक्टर ऑफिसपर्यंतचा रस्ता खोदून ठेवला असून त्याचे काम रखडले आहे.

या संपूर्ण विषयावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट)अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अल्तमश जरीवाला यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले असून, तातडीने काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, स्टेट बँक चौक ते जुने कलेक्टर ऑफिस हा शहरातील अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. नागरिक आणि व्यापारी या दोघांच्याही त्रासाकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. रस्त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून ड्रेनेज, पाण्याची समस्या त्वरित दूर करावी असे त्यांनी म्हटले आहे. स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनीही प्रशासनाकडे तीव्र संताप व्यक्त करत, आता तरी महापालिकेने जागे होऊन रस्त्याचे काम व ड्रेनेज दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी केली आहे.

# आपलेपणाचा दिवाळी फराळसाठी सहकार्य करण्याचे आवाहन

भिंगार – माणुसकी मित्र मंडळ, भिंगारच्या वतीने दिवाळीनिमित्त गरजवंतांना आपलेपणाचा दिवाळी फराळ देण्यासाठीचे आवाहन माणुसकी मित्र मंडळाचे संतोष गायकवाड, सौरभ धाडगे, कैलास उबाळे, सुनील राऊत यांनी केले आहे. माणूसकी मित्र मंडळाने दरवर्षी रोज डे ऐवजी रोटी डे साजरा करून अनेक गरजवंतांना भाजी, पोळी पोहोच केले आहे. ह्यावर्षी प्रथमच दिवाळीनिमित्त 'आपलेपणाचा दिवाळी फराळ' हा उपक्रम आम्ही राबवत आहोत तरी सहकार्य करावे

सदर आपलेपणाचा दिवाळी फराळ भिंगारवासियांनी २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत संतोष गायकवाड ह्यांचेकडे दत्त कृपा हेअर सलुन, मोहोटादेवी मंदिरासमोर, एम जी रोड, भिंगार येथे पोहोच करावे. सदर जमा दिवाळी फराळ गरजवंताना २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजेपासून पोहोच केले जाणार आहे. संपर्कासाठी संतोष गायकवाड ९५११८२५१४४, सौरभ धाडगे ९२७३८००२७७, कैलास उबाळे ८४५९०८५८७८, सुनील राऊत ९८२२७५८३८३.



**राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या शहराध्यक्षपदी अतुल देव्हारे यांची नियुक्ती**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या शहराध्यक्षपदी अतुल देव्हारे यांची नियुक्ती करण्यात आली. राज्य कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे यांच्या शिफारशी नुसार देव्हारे यांची नियुक्ती करण्यात आली असून, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष बबनराव घोलप यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड, राष्ट्रीय सचिव दत्तात्रय गोतीसे, प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे, प्रदेश सचिव अनिल कानडे, राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, नगर तालुका अध्यक्ष आप्पासाहेब केदारे, संतोष उदमले उपस्थित होते. अतुल देव्हारे हे उच्चशिक्षित (एमबीए फायनान्स) आहे.

# मुले व मुलींसाठी जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर फुटबॉल खेळाडू निवड चाचणीचे नगरमध्ये आयोजन

## जागतिक किर्तीचे फूटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची खेळाडूंना संधी

नगर – महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने ‘महादेवा’ ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉलमध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उदिष्ट आहे.

या योजनेचा एक भाग म्हणून राज्यातील १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवड चाचणीतून निवड होणाऱ्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची एक अभूतपूर्व संधी मिळणार आहे.


अहिल्यानगर जिल्ह्यातील १३ वर्षाखालील मुले व मुलींसाठी जिल्हास्तर निवड चाचणीचे आयोजन ३१ ऑक्टोंबर ते ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्यावतीने करण्यात येणार आहे. तरी वरील चाचणीकरिता आपल्या शाळेतील १३ वर्षाखालील मुले व मुलींना ३१ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ९ वा. अहमदनगर कॉलेज अहिल्यानगर या ठिकाणी उपस्थित राहणेबाबत सुचित करावे. तसेच चाचणीस्थळी येण्यापूर्वी गुगल नोंदणी लिंकद्वारे (Google registration link) आपली नोंद पूर्ण करुन घ्यावी.

https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEv7

खेळाडूंनी सोबत आणावयाची कागदपत्रे :– १. मुळ आधार कार्ड २. जन्म प्रमाणपत्र असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, विधान परिषद आणि राज्यसभेत राजकीय माजी सैनिकांची आरक्षणाची मागणी

**सरकारकडे शिफारस करण्याचे पद्मश्री पोपटराव पवार यांना निवेदन**



स्थानिक स्वराज्य संस्था, विधान परिषद आणि राज्यसभेत माजी सैनिकांची आरक्षणाची मागणी सरकारकडे शिफारस करण्याचे निवेदन पद्मश्री पोपटराव पवार यांना देताना माजी सैनिक.

नगर – माजी सैनिकांना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरच्या वतीने पद्मश्री पोपटराव पवार यांना सरकारकडे शिफारस करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी जय हिंदचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, अंबादास गोरे, राजू ठाणगे आदी उपस्थित होते. माजी सैनिकांना येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय तसेच स्वीकृत सदस्य म्हणून आरक्षण मिळण्याबाबत लक्ष वेधण्यात आले.

पोपटराव पवार यांनी माजी सैनिकांच्या मागणीला पाठिंबा दर्शवित गावोगावातील विकास प्रक्रियेत माजी सैनिकांचा सहभाग वाढला पाहिजे. माजी सैनिकांना राजकीय व स्वीकृत सदस्य आरक्षणाची मागणी योग्य असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जय हिंद फाउंडेशन तसेच महाराष्ट्रातील विविध सैनिक संघटनांच्या माध्यमातून मुख्यमंत्री, राज्यपाल, उपमुख्यमंत्री व निवडणूक आयोग यांच्याकडे सातत्याने राजकीय आरक्षणाची मागणी करण्यात येत आहे. ग्रामपंचायत, नगरपरिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषदेत प्रत्येकी एक सदस्य माजी सैनिक असावा, राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये एक जागा सैनिकांसाठी आरक्षित असावी, शिक्षक मतदारसंघाप्रमाणे सैनिक मतदारसंघ तयार करून सातही विभागांतून सात सैनिक आमदार निवडले जावेत, विधान परिषद व राज्यसभेतही प्रत्येकी एक सैनिक प्रतिनिधी असावा, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आलेली आहे.

लवकरच होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सैनिकांना प्रत्येक ठिकाणी आरक्षित उमेदवारी द्यावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हा परिषदेत ५ व पंचायत समितीत २ स्वीकृत सदस्यांची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या सदस्यांमध्ये एक जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित ठेवावी, अशी मागणी जय हिंद फाउंडेशनने केली आहे. अनेक माजी सैनिक मोठे सामाजिक कार्य करत आहेत; परंतु आर्थिक परिस्थिती नसल्याने ते निवडणूक लढवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या सेवेला मान देण्यासाठी स्वीकृत सदस्यपदाचे आरक्षण आवश्यक आहे. माजी सैनिकांमध्ये असलेली शिस्त, जबाबदारी आणि संघभावना या गुणांचा स्थानिक प्रशासनात मोठा उपयोग होऊ शकतो. ग्रामपंचायत पासून राज्यसभेपर्यंत सैनिकांचा सहभाग झाल्यास गाव, तालुका आणि जिल्ह्यांचा विकास वेगाने घडू शकणार असल्याचे शिवाजी पालवे यांनी सांगितले.

# बनावट लग्न लावून फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**मुख्य सूत्रधार महिलेस पोलिसांनी केली अटक, इतर आरोपींचा शोध सुरु**



बनावट लग्न लावून फसवणुक करणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधार महिलेला पकडल्या नंतर तिच्या समवेत कोपरगाव पोलिस.

कोपरगाव – बनावट लग्न लावून देवुन फसवणुक करणारे टोळीचा कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन कडुन फर्दाफाश करण्यात आला असून टोळीची मुख्य सुत्रधार महिलेला अटक करण्यात आली आहे. ज्योती राजु गायकवाड (रा. छत्रपती संभाजीनगर) असे या महिलेचे नाव आहे.

कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पो.नि.संदीप कोळी यांना १६ ऑक्टोबर रोजी दुपारी गोपनीय माहिती मिळाली की बनावट लग्न लावून देवुन फसवणूक करणारे टोळीची मुख्य सुत्रधार ही कोपरगाव बसस्टैंड येथे येणार आहे अशी माहीती मिळाल्याने पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी लगेचच पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक वैशाली मुकणे, पोलिस अंमलदार मधुसूदन दहिफळे, रघुवीर कारखेले, तमनर, सानप झडे, रहाणे यांचेसह कोपरगाव बस स्टैंड येथे जावून मिळालेल्या माहीतीचे आधारे ज्योती राजु गायकवाड (रा. छत्रपती संभाजीनगर) या महिलेस ताब्यात घेवून तिचेकडे बनावट लग्नाबाबत विचारपुस केली असता तिने प्रथमतः उडवाउडवीची उत्तरे दिली. तिला विश्वासात घेऊन विचारपुस केली असता तिने माहेगाव देशमुख ता. कोपरगाव येथे एक बनावट लग्न लावुन फसवणुक केल्याची कबुली दिल्याने सदर महिलेस ताब्यात घेतले आहे. कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनला राजेंद्र जनार्दन काळे (रा. माहेगाव देशमुख ता. कोपरगाव) यांनी तक्रार दिलेवरून खोटे लग्न लावून देवुन त्यांची २ लाख ३०हजार रुपयाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यात सदर महिलेस अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कस्टडी दिली असुन तिथेकडून आणखी साथीदार व खोटे लग्न लावुन देवून फसवणुक केल्याचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# धनादेश अनादर केसमधून आरोपीची निर्दोष मुक्तता

नगर – राजीव गांधी सहकारी पतसंस्था केडगाव, अ.नगर शाखेतून देवीदास केरू जाधव, रा.सारोळा कसार, अ.नगर यांना आर्थिक अडचणी प्रसंगी व शेत व्यवसाय साठी रू. ५ लाखाचे कर्ज घेतले व कर्जाची परत फेड करण्याच्या बद्दलात आरोपीने राजीव गांधी पतसंस्थेस आरोपीचे बँक खाते असलेल्या ॲक्सेस बँकेचा धनादेश दिला. सदरचा धनादेश आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने न वटता आला. बँकेने आरोपी देवीदास जाधव यांच्याविरूध्द धनादेश अनादर प्रकरणी १३८ कलमान्वये अ.नगर जिल्हा न्यायालयात केस दाखल केली होती. सदर खटल्यात आरोपीतर्फे केसचे कामकाज पहाण्याकामी ॲड. सचिन पाठक यांची नियुक्ती करण्यात येवून त्यांचे वकिलपत्र दाखल केले होते. सदर केसचे कामकाज चालवून सदर केस मधून आरोपीची निर्दोष मुक्ताता करण्यात ॲड. सचिन पाठक यांना यश आले.





भारतीय जनता पार्टी व क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद युवा मंडळातर्फे वसुबारस निमित्त गोमाता पूजन करण्यात आले.

# गोमाता पूजन हिंदू संस्कृतीत पुण्य कर्म : मयूर बोचुघोळ

**वसुबारस निमित्त गोमाता पूजन, क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठान व भाजपा मध्य मंडळाचा उपक्रम**

नगर – दिवाळी सणाची सुरुवात व वसुबारसे पासून होते. वसुबारस हा एक हिंदु सण आहे. श्रीकृष्ण जन्माच्या आधीच्या पंधरवड्यात येतो. गाय ही संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. वसुबारस सणाच्या निमित्ताने गाय आणि वासरांची पूजा करून या सणाच्या माध्यमातून पर्यावरण आणि प्राणी मात्र बद्दल आपली जबाबदारी अधोरेखित केली आहे. गेल्या चार वर्षापासून मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. गोमाता पूजन ही हिंदू संस्कृती आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांनी केले आहे.

चौपाटी कारंजा येथे भारतीय जनता पार्टी व क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद युवा मंडळाच्या वतीने वसुबारस निमित्त गोमाता पूजन करण्यात येते. भाजपा मध्य मंडळाचे अध्यक्ष मयूर बोचुघोळ, उमेश कारंजकर, मनोज हराळे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी गोमाता पूजन करण्यासाठी चौपाटी कारंजा, चितळे रोड, नालेगाव, सांगळे गल्ली परिसरातील माता, भगिनी व नागरिक उपस्थित होते.

# कॉ. भागवत वादविवाद स्पर्धेत मालपाणी लॉ कॉलेजला विजेतेपद



कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगरमध्ये कॉ. भागवत वादविवाद स्पर्धेत मालपाणी लॉ कॉलेजला विजेतेपद पटकावले.

नगर – कॉम्रेड एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिनिमित्त न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), अहिल्यानगरमध्ये ९ व १० ऑक्टोबर रोजी आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय वाद विवाद व वक्तृत्व स्पर्धेमध्ये आकाश बोडखे व इरफान शेख, श्री ओंकारनाथ मालपाणी लॉ कॉलेज, संगमनेर या संघाने वाद विवाद स्पर्धेमध्ये प्रथम व वक्तृत्व स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. पी. एन. पी. कॉलेज, अलिबागच्या यश पाटील व पंकज पांडूळे यांनी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तर जितेंद्र राऊत व पंकज पांडूळे यांनी वाद विवाद स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. वाद विवाद स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पार्थ चिडे व सचिन गायकवाड, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज, पुणे याने पटकावला. तर वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक अनुजा गाढे व पूजा जाधव, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांनी मिळविला. वादविवाद व वक्तृत्व या दोन्ही स्पर्धेतील चतुर्थ क्रमांक निखील बोडखे, न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव याने पटकावला.

वैष्णवी निर्मळ, पी. व्ही. पी. कॉलेज ऑफ फार्मसी, लोणी व विश्वास दसगुडे, सी. टी. बोरा. कॉलेज, शिरूर, पुणे यांना वादविवाद स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. तर संपदा लांडगे, न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर यांना वक्तृत्व स्पर्धेसाठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. कार्तिकी पवार व सान्वी लिखे या रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजच्या संघाने ज्युनिअर कॉलेज गटातील वादविवाद स्पर्धेचे विजेतेपद मिळवले.

पारितोषिक वितरणाच्या समारोप समारंभासाठी शेतकरी नेते कॉम्रेड सुभाष लांडे हे प्रमुख पाहुणे तर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार अॅड. दीपलक्ष्मी म्हसे अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी सध्याच्या काळात प्रत्येक मुद्याचे राजकारण केले जातेय. प्रचंड संशयाचे वातावरण तयार केले जात आहे. यासाठी तरुणांनी विचारपूर्वक कृती करण्याची गरज आहे, असे मत व्यक्त केले.

तसेच अध्यक्षांनी मनोगतात विद्यार्थ्यांनी बोलताना आपली भाषा जपून वापरत योग्य पद्धतीने आपला मुद्दा पटवून दिला पाहिजे असा सल्ला दिला. या स्पर्धेसाठी प्रा. निलेश पर्बत, संगमनेर व जगदीश पवार, पुणे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवकी ढोकणे यांनी केले आणि डॉ. सुनीता मोटे यांनी आभार मानले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. एस. बी. कळमकर व विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. ए. ई. आठरे उपस्थित होते.



आयएमएस व्यवस्थापन संस्थेच्या वतीने करंजी येथील पूरग्रस्तांसाठी मदत देण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी सामाजिक भावना जपण्यास पुढे आले पाहिजे

**निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांचे प्रतिपादन, आयएमएसने जपली सामाजिक बांधिलकी**

नगर – पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदना लक्षात घेऊन त्यांना मदत करण्यासाठी विद्यार्थांनी घेतलेला पुढाकार नक्कीच चांगला असून यापुढे देखील सामाजिक भावना जपण्यास पुढे आले पाहिजे, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी केले.

आयएमएस व्यवस्थापन संस्थेच्या वतीने करंजी येथील पूरग्रस्तांसाठी मदत देण्यात आली. या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अॅड. गोरख पालवे, करंजी गावचे सरपंच रफिक शेख, संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, संगणक विभाग प्रमुख डॉ. महेश पोतदार, शेतकरी, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

आयएमएस संस्थेच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मिळून रु. अठ्ठेचाळीस हजार ची मदत जमा केली. यातून बाधित पंचवीस शेतकऱ्यांना ३० किलो गव्हाची गोणी देण्यात आली. उर्वरित रकमेचा धनादेश शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी गीतेंना सुपूर्द करण्यात आला. यावेळी एन एम सथा ट्रस्ट च्या वतीने रु. पाच हजार चा धनादेश देखील सुपूर्द करण्यात आला.

डॉ. मेहता यांनी स्वागत करून सांगितले कि आपल्याला इतरांच्या दुखाची जाणीव झाली पाहिजे तरच आपण इतरांना मदत करू शकतो. संस्थेच्या वतीने नेहमीच असे सामाजिक उपक्रम राबविले जातात.

गीते यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना सांगितले कि आज तुम्ही विद्यार्थी दशेत आहात मात्र जेव्हा तुम्ही मोठ्या पदावर काम कराल तेव्हा निश्चित पणे सामाजिक जबाबदारीचे भान ठेवा. त्यातून समाजाची एकसंध पणाची भावना कायम राहील. शिवाय फक्त शासन एकटेच सर्व करू शकत नाही त्यासाठी लोकसहभाग देखील तितकाच महत्वाचा असतो तेव्हाच शासन योग्य रीतीने आपल्या योजना सर्व स्तरापर्यंत पोहचू शकतील.

रफिक शेख यांनी उपस्थितांना करंजी गावात झालेल्या नुकसानीची तसेच लोकांना सहन कराव्या लागलेल्या त्रासाची हकीकत सांगितली. कार्यक्रमाचे नियोजन आणि सूत्रसंचालन प्रा. विजय शिंदे, सी डी मोहिते यांनी केले.

# जिल्हा मराठा सेवा संघाच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी प्रवीण दहातोंडे, उत्तर जिल्हाध्यक्षपदी विवेक लव्हाट





नगर – अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा संघाच्या दक्षिण जिल्हाध्यक्षपदी जलसंपदा विभागाचे अभियंता प्रवीण दहातोंडे यांची तर उत्तर जिल्हाध्यक्षपदी संगमनेर विभागाचे सहाय्यक अभियंता इंजिनीयर विवेक लव्हाट यांची निवड करण्यात आली.

संगमनेर येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कार्यकारणी निवडीसाठी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

यावेळी संघाचे जेष्ठ मार्गदर्शक अर्जुन राव तनपुरे, सहाय्यक प्रदेश समन्वयक बाळासाहेब शेटे, विभागीय अध्यक्ष राजेंद्र निंबाळते, प्रदेश समन्वयक मनोज ढोकचौळे, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पुरुषोत्तम खेडेकर म्हणाले की मराठा सेवा संघाच्या स्थापनेपासून संघाने मराठा व बहुजन समाजाच्या हितासाठी मोठ्या प्रमाणात चळवळ राबवली आहे. मराठा समाज जागृत व्हावा समाजातील जे वंचित घटक आहे त्याला न्याय देण्यासाठी संघाने सातत्याने प्रयत्न केला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब खर्डे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारी अभियंता हापसे, अमोल कवडे, गणेश हासे आदींनी सहकार्य केले.

निवड झालेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे –

महानगर कार्याध्यक्षपदी इंजिनीयर श्रीकांत निंबाळकर, ग्रामीण कार्याध्यक्षपदी बापूसाहेब वराळे, अरुण घावटे, समन्वयकपदी प्रल्हाद शिंदे, किशोर मरकड तर उपाध्यक्षपदी संकेत कराळे., उपाध्यक्ष महिला धनश्री शिंदे, स्वाती साठे सचिवपदी अजिंक्य थोरात, सहसचिव ऋषिकेश चव्हाण, खजिनदार नितीन ढोले, सखजिनदार गिरीश मरकड, पालक सदस्य सुधीर शिंदे, कार्यालयीन सचिव संतोष शिंदे, मुक्ताजी शेळके, प्रशांत काकडे प्रवक्ते म्हणून संभाजी निमसे, महेश बनकर, संतोष निमसे, समन्वयक परिमल ह्याळीज, प्रचार प्रमुख दिनेश शेळके, विभागीय सदस्य म्हणून गणेश कवडे, अभिजीत पानसंबळ, स्वप्नील तनपुरे यांची निवड करण्यात आली.

लवकरच तालुका आणि शहर अध्यक्षांची नियुक्ती केली जाईल असे यावेळी लव्हाट व दहातोंडे यांनी सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### इअरफोन वापरणे टाळावे

मोबाईल ही अशी वस्तू झाली आहे, जिच्याशिवाय आता कोणीच राहू शकत नाही. मोबाईल दिसला नाही की खूप जणांची चिडचिड होऊ लागते. पूर्वी मोबाईल हा फक्त मोठ्या माणसांसाठी कामाची अशी वस्तू होती. पण आता ती अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सगळ्यांसाठीच जीवनावश्यक वस्तू बनून गेली आहे. इअरफोन किंवा हेडफोन घालणे व गाणे वगैरे ऐकणे तुमच्या कानांसाठी खूप हानिकारक आहे. सतत येणाऱ्या ध्वनी कंपनाचा कानाच्या नसा आणि ड्रमवर परिणाम होतो. यामुळे हळूहळू श्रवणशक्ती कमी होऊ शकते, ज्याला 'आवाज-प्रेरित श्रवणशक्ती कमी होणे' म्हणतात. याशिवाय, जास्त वेळ इअरफोन घालल्याने कानात संसर्ग, खाज सुटणे किंवा जळजळ देखील होऊ शकते.

## पाककला

### दुधी भोपळ्याची रिंग भजी

**साहित्य :** १/२ दुधी भोपळा, १ कप बेसन पीठ, १ टेबलस्पून तांदळाचे पीठ, १ टीस्पून धने पावडर, १/२ टीस्पून जीरे पावडर, १ टेबलस्पून लाल तिखट, १/४ टीस्पून हळद, १/८ टीस्पून हिंग, १/२ टीस्पून ओवा (आवडत असल्यास), चवीप्रमाणे मीठ, थोडे ब्रेड क्रम्स्, थोडी चिरलेली कोथिंबीर, तेल

**कृती :** दुधी भोपळा सालून व धुऊन घेणे. सुरीने त्याचे मध्यम जाडसर आकाराचे, गोल काप करून घेणे. मध्यम आकाराच्या बाटलीचे टोपण घेणे. एक गोल काप घेऊन त्याच्यामध्ये झाकण ठेवणे व दाबून मधला गोल करून घेणे. अशाप्रकारे सर्व गोल रिंग्स तयार करून घेणे. लाल तिखट व मीठ रिंग्स् ला लावून, चोळून बाजूला ठेवणे. एका बाऊलमध्ये बेसन पीठ व तांदळाचे पीठ घेणे. सर्व मसाले घालून घेणे. ओवा हाताने चोळून त्यात घालावा. सर्व व्यवस्थित मिक्स करून घेणे. थोडे थोडे पाणी घालून पीठ भिजवून घेणे. गॅसवर कढईत तेल तापत ठेवणे. भिजवलेल्या पिठात थोडी कोथिंबीर चिरून घालणे. पीठ घट्ट वाटत असल्यास, एक टेबलस्पून पाणी घालून, हलवून घेणे. दोन-तीन रिंग पिठात बुडवून घेणे. पीठ व्यवस्थित निथळून घेणे. पिठात बुडवून व ब्रेडक्रम्स मध्ये घोळवून घेणे. नंतर तेलात सोडावे. कढईत जेवढे मावतील, तेवढे घालावे. दोन्ही बाजूने छान लालसर होईपर्यंत तळून घेणे. गॅस मध्यम आचेवर ठेवावा. अशाप्रकारे सर्व भजी तळून घेणे. टोमॅटो सॉस बरोबर किंवा नुसती खाल्ली तरी छान लागतात.

## वास्तू

✽ जर तुमच्या ओल्या केसांमधून पाणी टपकत असेल तर तुम्ही चुकूनही पूजा करू नये, अन्यथा पाप लागू शकते.

✽ रविवारी नवीन कपडे परिधान केल्याने रोग आणि दोषांची शक्यता वाढते.

✽ शनिवारी नवीन कपडे परिधान केल्याने शनिदेव क्रोधित होतात आणि ते घातक ठरू शकतात.

✽ जर अचानक एखादा कावळा येऊन तुमच्या खांद्यावर बसला, तर हे येणाऱ्या दुर्दैवाचं संकेत असतं.

## सल्ला

कपडे जलद सुकण्यासाठी कपडे जास्त घट्ट पिळून घ्यावे. त्यामुळे जास्तिच पाणी निघून जाईल आणि कपडे लवकर सुकतील.

## सौंदर्य

दररोज सकाळी गाल फुगवून दहा मिनिटे तसेच ठेवावे असे नियमित केल्याने चेहऱ्याची त्वचा ढीली पडली असेल तर ती टाईट होते व सुरकुत्या रहात नाही गाल देखील भरलेले दिसतात

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५

**शिवरात्री, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, उत्तरा १७|५०, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** शत्रूंना मात द्याल. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल. काम व इच्छित योजनेला अमलात आणाल.

**वृषभ :** आरोग्याची काळजी घ्याल. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे तोट्याचे ठरेल.

**मिथुन :** आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील.

**कर्क :** आर्थिक पक्षाबाबत सुकसान होईल. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील.

**सिंह :** आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आपल्या इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**कन्या :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** वाहने चोरीस जातील. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई केल्यास नुकसान होईल.

**वृश्चिक :** पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. सुख-शांतीचे वातावरण राहील.

**धनु :** बेपर्वाईने कार्य केल्याने नुकसान, कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल. जुने गैरसमज दूर होतील.

**मकर :** मागील एखादे बाकी राहिलेले काम आज पूर्ण होईल. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल.


**कुंभ :** हितशत्रूंवर मात कराल. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**मीन :** आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. बळात वाढ होईल.


**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८७

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२८६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) एक निवृत्त भारतीय क्रिकेटपटू ७) एकामागून एकाला पकडण्याची पोलिसांची कारवाई ८) झाडाखालचा ओटा; पलीकडे ९) अल्प; थोडे १०) गरीब; प्रामाणिक; नीतिमान १२) सत्यस्थिती; वस्तुस्थिती १३) ताकदवान; जोमदार; बलवान १४) पाण्याचा बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू १५) मला १६) ऐकण्याचे इद्रिय; कर्ण १८) ज्याला वंदन करावे असा २०) घट्ट; गच्च; खोगीर आवळण्याची वादी २१) घट्ट नसलेले; साडी; द्रवरूप २२) दणकट; कणखर; बलवान

**उभे शब्द -** १) बावळट; वेडसर; गबाळा २) फळातील रसाळ भाग; मगज ३) पाणचट; अळणी; बेचव ४) एकेक बाब घेऊन ५) बाजू; शेवट ६) उसंत; सवड ८) भिंतीवर सरपटणारा व किडे खाणारा एक जीव १०) सावध रहा; खबरदार ११) आवश्यकता असलेला; जरुरी असलेला १३) उत्साह; दम; जोर; बळ; अवसान १६) नित्य; पर्मनंट; अखंड १७) साथ; सोबत; संग १९) पान; अर्धा भाग; सैन्य २०) कापडाचे एक खांबी घर

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : शब्द देवून आस निर्माण करण्यापेक्षा साथ देवून विश्वास निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणती मिरची जास्त तिखट असते हिरवी की लाल?

मिरची हे प्रत्येक स्वयंपाक घरातील एक महत्वाचा घटक आहे. तसेच मिरचीचा तिखटपणा समजून घेणे हा एक गुंतागुंतीचा विषय आहे. तिखटपणाचे मुख्य कारण म्हणजे मिरचीमध्ये आढळणारे कॅप्सेसिन नावाचे रसायन. स्वयंपाकघरात काम करताना, कोणीही कोणतीही वेगळी गणना करू शकत नाही, येथे अंदाज आणि मिरचीच्या प्रकाराच्या आधारेच तिखटपणा शोधता येतो. तसेच हलक्या हिरव्या मिरच्या कमी तिखट असतात तर जास्त असलेल्या असतात. याचे कारण म्हणजे जेव्हा मिरची कच्ची असते तेव्हा तिचा रंग हलका हिरवा असतो. ती पिकू लागते तेव्हा त्यात कॅप्सेसिन नावाचे रसायन वाढू लागते. हे रसायन मिरचीला तिखट बनवते. या पिकण्याच्या प्रक्रियेत मिरचीचा रंग गडद हिरवा होऊ शकतो. म्हणून, गडद हिरव्या मिरच्यांना तिखट मानले जाते, यामागे तसेच लाल मिरची ही हिरव्या मिरच्याच्या अगदी विरुद्ध आहे. हलकी लाल मिरची खूप तिखट असते तर गडद लाल रंगाची मिरची कमी तिखट असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे काश्मिरी लाल मिरची. जी तिच्या गडद लाल रंगासाठी ओळखली जाते परंतु तिचा तिखटपणा खूप कमी असतो. या मिरच्या अन्नाला रंग आणि चव देतात. तसेच, मिरचीचा तिखटपणा त्याच्या रंगापेक्षा त्याच्या विविधतेवर जास्त अवलंबून असतो.

### राक्षसाची भिती


एका शहरात भद्रसेन नावाचा एक राजा राहत होता. त्याची मुलगी रत्नावती खूप सुंदर होती. तिला नेहमीच भीती वाटत असे की कोणीतरी राक्षस तिचे अपहरण करेल. तिच्या राजवाड्याभोवती सर्वत्र पहारा होता.

एका रात्री एक राक्षस पहारेकऱ्यांच्या नजरेतून सुटून रत्नावतीच्या महालात घुसला. तो एका अंधाऱ्या कोपऱ्यात लपला असताना, त्याने रत्नावतीला तिच्या एका मैत्रिणीला बोलताना ऐकले, हा दुष्ट विकल मला नेहमीच त्रास देतो, यावर उपाय शोधा. राजकुमारीकडून हे ऐकून, राक्षसाला वाटले की विकल नावाचा आणखी एक राक्षस असावा, ज्याला राजकन्या इतकी घाबरते. कसा तरी आपल्याला कळावे की तो कसा आहे? तो किती बलवान आहे? असा विचार करून तो घोड्याचे रूप धारण करून तबेल्यात लपला. त्या रात्री, काही काळानंतर, एक चोर राजवाड्यात आला. तो फक्त घोडे चोरण्यासाठी तिथे आला होता.

तो गोठ्यात गेला आणि घोड्यांची काळजी घेतली आणि घोड्याच्या आकाराच्या राक्षसाला सर्वात सुंदर घोडा पाहून तो त्याच्या पाठीवर चढला. घोड्याच्या आकाराच्या राक्षसाला वाटले की हा माणूस नक्कीच विकल राक्षस आहे आणि त्याने मला ओळखले आहे आणि तो मला मारण्यासाठी

(क्रमश:)

## जीवन का अमृत (भाग १)



दया तथा आशीर्वाद देता है। बातें करना आसान है, कर्म करना मुश्किल है। बातों से कुछ प्राप्त नहीं होता, पर कर्म से हम रास्ते पर उन्नति कर सकते हैं।

अतः आध्यात्मिक अभ्यासों में नियमित रूप से, प्रेम और विश्वास के साथ समय देना न भूलें और आप दिन-ब-दिन तरक्की करेंगे। आपको ऊपर

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

कार्यरत गुरु-शक्ति से हर जरूरी आंतरिक सहायता मिलेगी। शिष्य के लिए सदाचारी जीवन के सभी नैतिक गुणों पर सख्ती से चलना जरुरी है। पवित्र और शुद्ध जीवन, रास्ते पर उन्नति के लिए जरुरी है। ये आधारभूत सिद्धांत है और इनमें ढील नहीं दी जा सकती है। जो कोई भी इन्हें तोड़ेगा, उसे इनका फल भुगतना होगा।

जिंदगी की आँधियों का, चाहे वे कितनी भी तेज क्यों न हों, सामना अवश्य करना होगा, पर ऐसा गुरु-शक्ति में पूर्ण आस्था रखकर और भजन-सिमरन में नियमित रह कर करें।

इससे आँधियों की तीव्रता कम हो जाती है तथा उम्मीद और खुशी मिलती है। आँधियाँ तो क्षणिक होती हैं, वे आती जाती रहती हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

काटने को दौड़ते हैं। निराशा के विचारों से बदबू पैदा होती है । जिस से सभी लोग भागते हैं। निराश व्यक्ति को सभी असहयोग करते हैं। भिखारी उदास होते हैं इसलिये लोग तवजो नहीं देते। शराबी सड़को पर पड़े रहते हैं उन्हे कोई उठाता नही । जब क्रोध करते हैं तो उस से जो तरंगे निकलती हैं वह आग जैसी तीखी होती हैं उनसे बहुत गर्मी लगती है यही कारण है क्रोधी से हर कोई बचने

### आज्ञा चक्र

की कोशिश करता है। पांच सूक्ष्म विकारों से अलग अलग प्रकार की दुर्गंध निकलती है, जिस से तन मन बेचैन हो जाता है। वर्तमान समय मानव सूक्ष्म विकारों से पीड़ित है। लोग बोलते अच्छा हैं। ऊंच पदों पर हैं। प्रबंधक अच्छे हैं। नामी ग्रामी हैं । परंतु उनसे जब मिलते हैं तो अच्छी महसूसता नहीं होती। सूक्ष्म विकारों की बदबू महसूस होती है। अपनापन नहीं लगता। इसलिये मानसिक रोग बढ़ रहे हैं। जिन विचारो से बुरा बुरा महसूस हो तो समझो बदबू निकल ही है। लोभ में बुरा बुरा सा लगता है, पश्चाताप सा होने लगता है, ऐसा लगता है जैसे कुछ गलत होने वाला है, परंतु लोभ के वश फंस जाते हैं और लेनदेन कर लेते हैं। (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'बस चलते रहना है...'

एका कुटुंबाने दिवाळीच्या सुट्टीत पंधरा दिवसांच्या सहलीचे नियोजन केले. घरातील प्रत्येकजण त्या दृष्टीने तयारी करु लागला. अत्यावश्यक, अनावश्यक ही यादी जो तो लिहु लागला. कुठे मुक्काम करायचा, कुठे काय-काय पाहायचं, वाटेत कोण-कोणती गावं आहेत, आपला कुणी नातेवाईक, परिचित आहेका ह्याचाही विचार सामुहिकपणे करु लागले. कोणता ड्रेस कोणत्या दिवशी घालायचा. कोणत्या हॉटेलमध्ये मुक्काम करायचा, उपवासाचे वार, ह्या सगळ्या सहलीचा एकुण अंदाजे खर्च किती येईल, सहलीतील वेगवेगळ्या ठिकाणाहुन काय - काय खरेदी करायचं ह्यावर सविस्तर चर्चा झाली. जो तो आपल्याला अत्यावश्यक असणारं बॅगेत भरु लागला.

काय - काय घ्यायचं राहिलं ते ते आठवु लागला. मिळेल तसं बॅगेत भरु लागला. बॅग भरु लागली. सहलीला जाण्याच्या एक दिवस आधी, काही घ्यायचं राहिलं नाहीना, ह्याची खात्री करुन घेण्यासाठी बॅगेतील वस्तु, कपडे बाहेर काढुन पुन्हा बॅगेत ठेवले. आणि हसतमुख चेहऱ्याने दुसऱ्या दिवशी पहाटे ठरलेल्या वेळी गाडी आली. प्रत्येकाने आपल्या सोयीस्कर जागा निवडली. स्थानापन्न झाला. 'गणपती बाप्पा मोरया' म्हणत नमस्कार करुन नारळ वाढवुन प्रवास सुरु झाला. वाऱ्याची झुळुक शरिराला स्पर्श करु लागली तसतसं छान वाटु लागलं. दोन तासांच्या अंतराने गाडी थांबली. नाष्टा केला गेला. पुन्हा प्रवास सुरु झाला. दोघेजण मोबाईल पाहण्यात दंग. मुलं गाडीबाहेरचं निसर्ग सौंदर्य पाहताहेत. एकंदरित प्रवास सुखकर चालु आहे. पहिलं ठिकाण आलं. सगळे खाली उतरले. मोबाईलमध्ये निसर्ग क्लिक केला. सेल्फी घेतल्या. पुन्हा पुढचा प्रवास सुरु. गप्पा, गोष्टी, गाण्याच्या भेंड्या खेळत, नातेवाईकांविषयी बोलत प्रवास होतो आहे. एकेक दिवस करत पंधराव्या दिवशी गाडी घराजवळ येऊन उभी राहिली. प्रत्येकजण उतरला.

घरात गेला. प्रवासामुळे थकलेलं शरिर बेडवर पडलं. पंधरा दिवसांतला सगळा प्रवास, ठिकाणं, मुक्काम, हॉटेल, गमती-जमती प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर दिसु लागल्या. पंधरा दिवसांच्या प्रवासाकरिता कितीतरी तयारी आपण करतो हे त्या सगळ्यांच्या लक्षात आलं. त्यादिवशी संध्याकाळी सगळे एकत्रित जेवायला बसले. तेव्हा वडिल म्हणाले, 'अविस्मरणीय झाला प्रवास, सहल. दैनंदिन जीवनातुन बदल अनुभवायला मिळाला. मन, तन प्रसंन्न झालं. उद्यापासुन आपलं दैनंदिन जीवन सुरु होणार आहे. ' प्रत्येकाने होकार दिला. 'पंधरा दिवसाच्या प्रवासाकरिता अत्यावश्यक, अनावश्यक वर्गवारी केली. आनंद घेत प्रवास केला. पण जीवनाच्या प्रवासाविषयी कधी विचार केलाय का?' ह्या प्रश्नावर प्रत्येकजण - विचार करु लागला. 'मुलांनो, जीवनाचा प्रवास एकदाच आहे मग तो प्रवास तर फारच विचारपूर्वक करायला पाहिजे जर आपण पंधरा दिवसांचा प्रवास फारच विचारपूर्वक करत असु तर. ' प्रत्येकाने होकारार्थी मान हलवली. सहल, प्रवास म्हणजे नेमकं तुमच्या दृष्टीने काय?' ज्याला जे सुचेल ते त्याने सांगितलं.'

वडील म्हणाले, 'आपल्या गाडीत आणखी एकजण बसु शकला असता तुमचा एखादा मित्र.' दोन्हीही मुलं आश्चर्याने पाहु लागले. वडिल म्हणाले, 'दुसऱ्यांनाही आनंद होईल अशी कृती आपण केलीच पाहिजे. पंधरा दिवसांच्या प्रवासासाठी केवढी तयारी केली आपण. मनुष्य जीवन एकदाच मिळतं. मग त्याचा प्रवास तर फारच विचारपूर्वक, अभ्यासपूर्ण केला पाहिजे. प्रवास म्हणजे चालनंचना ? इतरांना सोबत घेऊन चालायला पाहिजे. त्यांचा हात, आपल्या हातात घेतला पाहिजे. त्यांच्या सुख, दुःखात सहभागी व्हायला पाहिजे. बस चलते रहना है, अच्छी-सच्ची सोच के साथ, औरोंको साथ लेके, मंजिल की ओर. मुलांनो, आपल्याजवळचं गरजवंताला देणं ह्यासारखा दुसरा आनंद नाही, समाधान नाही. जीवनाच्या ह्या प्रवासात आपण, एकमेकांचा हात हातात घेऊन चालायचं. ह्यामुळे कुणीही मागे राहणार नाही, कुणीही हात सोडुन पुढे जाणार नाही.

आपण एकमेकांसोबत चालत राहु. एकमेकांसोबत चालण्यामुळं दूर अंतरावर जायचं असेल तर थक्वा येणार नाही. प्रवासातले अनुभव एकमेकांना सांगायचे. एकमेकांमधलं चांगुलपण, एकमेकांना सांगायचं. दुसऱ्यातलं चांगुलपण मान्य करायला आपलं मन मोठं असावं लागतं. प्रवासात पावलं ज्याची-त्यालाच उचलायची आहेत पण आपण सोबत चाललो की पावलांनाही आनंद होतो कारण त्यांना माहित असत प्रवास नक्कीच आनंददायी होणार आहे.' वडिलांचं बोलणं ऐकुन दोन्हीही मुलांना खूप चांगलं वाटलं. आता आपण, बस चलते रहना है ह्या विचाराचा अंगिकार करायचाच हे दोघांनी मनापासून ठरवलं. सोबत चालणं ही फक्त एक क्रिया नाही तर सुख-दुःखाची, चांगल्या-वाईट अनुभवांची सोबत आहे. एकमेकांना, एकमेकांचा आधार आहे, असतो. बस चलते रहना है ह्याचा अंगिकार कराल ही अपेक्षा आहे. 'साहित्य सहवास' म्हणजे वाचकांना चांगलं देणाऱ्या लेख, लघुकथांचा बस चलते रहना है ह्या विचाराचा मी केलेला अंगिकार आहे.

(लेख क्र.५७१)

**- सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

**वडील :** तू एक काम धड करत नाहीस, तुला पुदिना आणायला सांगितला होता तू कोथिंबीर घेऊन आलास, तुझ्यासारख्या मुर्खाला घरातून बाहेर काढले पाहिजे

मुलगा : बाबा! चला एकत्र जाऊया आई म्हणत होती ही मेथी आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ शांतता काळात दिले जाणारे पुरस्कार कोणते?

- अशोक चक्र, किर्ती चक्र, शौर्य चक्र

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

एकूणच या सहा वर्षांमध्येच त्याच्या भावी आ व्यक्तिमत्त्वाचा विकास होणार असतो. त्यातही पहिली तीन वर्षे ही जास्त महत्त्वाची अर आयष्यातील त्याचे हिलरी क्लिंटन यांनी म्हटले आहे, की एखाद्या व्यक्तीचे बालपणाच्या आयुष्यात परस. गंध यांचा आई-वडिलांशी असलेले नाते, त्याच्या पंचेंद्रियांचा

### बौद्धिक विकास कसा करावा?

म्हणजेच शब्द, स्पर्श, रूप, रस, अनुभव यामुळे बालकाचा मेंदू प्रगत होतो. बालपणातीलच अगदी सुरुवातीच्या का मिळणाऱ्या अनुभवामुळेच बालक आनंदी नागरिक होणार की दुःखी होणार, शिस्ताप्रय बेशिस्त राहणार, जबाबदारी घेणारा पालक होणार की आयुष्यभर निधास्त वृत्तीचा पालक सह हे ठरत असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




## औषधांमुळे हृदयविकाराचा झटका?

**वजन कमी करण्याच्या औषधांमुळे हृदयविकाराचा झटका?**

तुमच्यासाठी सगळ्यात मोठी समस्या कोणती आहे, असे आजच्या काळात कोणाला विचारले तर बहुतेकांचे उत्तर लठ्ठपणा हेच असते. सध्या लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण यामुळे त्रस्त आहेत. बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आणि चुकीचा आहार यामुळे ही समस्या झपाट्याने वाढते आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी बरेचजण औषधांचा आधार घेतात; पण अनकांना वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे हृदयविकाराचा झटका येण्याची भीतीही असते.

आरोग्य चर्चा

डॉ. दिलीप शिरसाट



**अभ्यास काय सांगतो?**

काही दिवसांपूर्वी अमेरिकेत यासंबंधीच्या ओझेम्पिक नामक औषधावर संशोधन करण्यात आले. सशोधनात ही औषधे फक्त वजनच कमी करत नाहीत तर हृदयाच्या आजारांमध्येही मदत करत असल्याचे आढळले. ङ्मास जूरल ब्रिघमफ ग्रुपच्या डॉक्टरांनी केलेल्या या अभ्यासाने जगभरात लक्ष वेधले. औषध घेतल्यानंतर रुग्णांची रुग्णालयात जाण्याची वारंवारिता खूप कमी आल्याचेही आढळले. या अभ्यासात जास्त लक्ष दिली गेलेली सेमाग्लूटाइड आणि टिर्झेपेटाइड ही दोन औषधे होती. या अभ्यासात ९० हजार रुग्णांचा समावेश होता. त्यांना हार्ट फेल्युअर, लठ्ठपणा आणि टाईप-२ डायबेटीस अशा समस्या होत्या.

**औषधांमुळे खरेच हार्ट अटॅक येतो का?**

या संशोधनातून वजन कमी करणाऱ्या औषधांमुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो, ही धारणा चुकीची ठरली आहे. संशोधनात दिसले, की सेमाग्लूटाइड घेणाऱ्यांमध्ये मृत्यू किंवा हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याचे प्रमाण ४२ टक्क्यांनी कमी झाले तर टिर्झेपेटाइड वापरणाऱ्यांमध्ये हा परिणाम आणखी जास्त म्हणजे ५८ टक्क्यांपर्यंत पोहोचला.

**काय लक्षात ठेवावे?**

वजन कमी करण्यासाठी औषधे घ्यायची असतील तर फक्त खऱ्या आणि ब्रँडेड औषधांचा वापर करा.


## स्पाँडिलायटिस आहे?

सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणे अधिक प्रमाणात आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार कोणालाही होऊ शकतो. सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येकालाच तारेवरची कसरत करावी लागत आहे. कमी वेळेत जास्तीत जास्त कामं पार पाडावी लागत असल्याने दमछाक होणं स्वाभाविक आहे. यातूनच विविध आजार उद्भवतात. त्यात इतर काही आजारांप्रमाणेच अलीकडे स्पाँडिलायटिसचा विकारही मोठ्या प्रमाणावर दिसून आलं आहे. सर्वसाधारणपणे मानेच्या किंवा कंबरेच्या स्पाँडिलायटिसची लक्षणं आढळून येतात. आपण आजूबाजूला वावरताना मानेला किंवा कंबरेला पट्टा बांधलेले अनेकजण आढळतात. ते शक्यतो स्पाँडिलायटिसचेच रूग्ण असतात. हा विकार स्त्री किंवा पुरुष कोणालाही होऊ शकतो. पूर्वी या विकाराने त्रस्त असणाऱ्यांची संख्या बरीच कमी होती. शिवाय हा विकार उतारवयातच होत असे. मात्र अलीकडे तरूण वयातही या आजाराची लक्षणं दिसून येत आहे. तारूण्यातच असा आजार जडल्यास संबंधित व्यक्तीची मानसिक अवस्था भलतीच बिकट होते. अर्थात अलिकडे या आजारावर प्रभावी उपचार करणं शक्य झालं आहे. मात्र आधी स्पाँडिलायसिस म्हणजे काय हे जाणून घेणं गरजेचं ठरेल.

आरोग्यवेध

आपल्या शरीरातील प्रत्येक मणक्यामधून नसेद्वारे रक्तपुरवठा केला जातो. काही कारणाने या नस दबल्या गेल्यास स्पाँडिलायटिसचा विकार उद्भवतो. मान दुखणं, वळवताना किंवा हलवताना त्रास होणं, हात दुखणं, हाताला मुंग्या येणं अशा प्रकारची लक्षणे जाणवू लागतात. यालाच सर्व्हायकल स्पाँडिलायसिस म्हणतात. दुसऱ्या प्रकारात कंबर दुखणं, दोन्ही किंवा एक पाय वरून खालपर्यंत दुखणं, पायांना मुंग्या येणं, जड वाटणं, बधिर झाल्यासारखं वाटणं, थोडीशी हालचालही त्रासदायक वाटणं अशा स्वरूपाची लक्षणं जाणवू लागतात. यालाच लम्बर स्पाँडिलायटिस असं म्हणतात.

पुरुषांमध्ये अँकिओझिंग स्पाँडिलायटिसचं प्रमाण अधिक आढळून येतं. यामुळे माकडहाड तसंच मणके अधिक प्रमाणात प्रभावित होतात. यामध्ये स्नायू आखडण्यापासून सुरुवात होते. त्यानंतर हळूहळू मान आणि कंबरेची हालचाल बंद होते. शिवाय कंबरेला बाक येण्याचीही शक्यता असते. संबंधित रुग्णाला चोवीस तास वेदना होत असतात. त्यामुळे मान हलवणंही अशक्य होऊन जातं. सदर लक्षणांवरून या आजाराचं गंभीर स्वरुप तसंच रुग्णांना सहन कराव्या लागणाऱ्या वेदनांची कल्पना येते. रुग्णामध्ये आढळणाऱ्या लक्षणावरून त्याला कोणत्या स्वरूपाचा स्पाँडिलायसिस झाला आहे हे निश्चित केलं जातं.



सतत एका दिशेला नजर स्थिर करून पहात राहणं, मान अचानक वळवणं यासारख्या कारणांमुळे मानदुखी निर्माण होते. सुरुवातीच्या काळात या व्याधीकडे दुर्लक्ष केल्यास गुंतागुंत वाढण्याची शक्यता असते. शिवाय सतत वाकून काम कराव्या लागणाऱ्या व्यक्तींमध्ये कंबरदुखीची लक्षणं जाणवतात. शिवाय कंबर आखडणं किंवा त्या भागाला रक्तपुरवठा सुरळीत न होणं अशी लक्षणंही दिसून येतात. यातील कोणत्याही लक्षणांवर तातडीने उपाय करणं गरजेचं ठरतं. विशेषत: वाहनचालकांना कंबरदुखीचा त्रास अधिक प्रमाणात होत असल्याचं दिसून आलं आहे. सतत एकाच अवस्थेत बसून वाहन चालवल्यामुळे कंबरेचे स्नायू आखडतात. त्यातून कंबरदुखी निर्माण होते. कारणं कोणतीही असली तरी मानदुखी किंवा कंबरदुखीवर वेळीच इलाज करणं महत्त्वाचं ठरतं.

स्पाँडिलायटिसच्या विकारामध्ये एक्स-रे तसंच एमआरआय चाचण्या उपयुक्त ठरतात. शिवाय या विकारावर प्रभावी ठरतील अशी औषधे होमिआपॅथीमध्ये उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे होमिओपॅथीच्या उपचारामुळे स्पाँडिलायटिससारखा विकार पूर्णपणे बरा होतोच शिवाय तो पुन्हा उद्भवण्याची शक्यताही नसते. शरीराच्या एखाद्या भागातील दबली गेलेली नस पूर्ववत करण्यासाठी ही औषधं उपयोगी ठरतात. त्यामुळे मानेचा किंवा कंबरेचा पट्टा सुटण्यास आपोआपच मदत होते. अर्थात या विकारावरील होमिओपॅथीची औषधे एक महिन्यापासून सहा महिन्यांपर्यंतच्या कालावधीसाठी घ्यावी लागतात. कोणताही विकार समूळ नष्ट करण्यासाठी काही कालावधी जाऊ द्यावा लागतो. तोपर्यंत सातत्याने आणि वेळेवर उपचार घेणं गरजेचे ठरतं. ही औषधं प्रभावी ठरण्याचं आणखी एक कारण म्हणजे मानसिक ताणतणावांवर होमिओपॅथीचा इलाज प्रभावी ठरतो. त्यामुळे स्पाँडिलायटिसचा विकार कमी होण्याबरोबरच मानसिक ताणतणावांपासूनही सुटका होते. शिवाय या उपचारामुळे शांत झोप लागणं शक्य होत असल्यामुळे रूग्णाच्या शारीरिक क्षमतेत वाढ होते.

थोडक्यात, स्पाँडिलायटिसबरोबरच शरीरातील इतर व्याधींवरही होमिओपॅथीचा उपचार प्रभावी ठरत आहे. यादृष्टीने रुग्णांनी विचार करून या उपचारपद्धतीचा आधार घ्यायला हवा. त्याद्वारे रूग्णांचं जीवन सुखकर होण्यास मदत होते.

## मानसिक आरोग्याचे शरीरावर दुष्परिणाम

मानसिक आरोग्य चांगले राखणे म्हणजे आपले विचार, भावना आणि वर्तनात संतुलित राखण्याची क्षमता वाढवणे. चांगले आरोग्य आपल्याला ताणतणावाचे व्यवस्थापित करण्यास, समस्यांना तोंड देण्यास, माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि इतरांशी निकोप संबंध निर्माण करण्यास मदत करते. मात्र जागतिक आरोग्य संघटनेच्या मते सध्या जगभरातील अंदाजे सातपैकी एक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या मानसिक आरोग्य समस्येने ग्रस्त आहे.


मानसिक आरोग्य बिघडण्याची अनेक कारणे आहेत. त्यात सततचा ताण, कामाचा किंवा अभ्यासाचा दबाव, झोपेचा अभाव, अस्वास्थ्यकर जीवनशैली आणि नकारात्मक विचार यांचा समावेश आहे. सामाजिक संबंधातील तणाव, कुटुंब आणि मित्रांपासून अंतर तसेच वैयक्तिक आव्हाने या गोष्टीदेखील मानसिक आरोग्यावर परिणाम करतात. मानसिक आरोग्यावर वेळेत लक्ष देणे आणि किरकोळ समस्या गंभीर होण्यापासून रोखण्यासाठी गरज पडल्यास तज्ज्ञांची मदत घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

दुखणी-उपचार

डॉ. मोहन सहस्त्रबुद्धे

नैराश्य, चिंताविकार, ताण, मूड स्विंग आणि कमी आत्मसन्मान ही मनोविकाराची प्राथमिक लक्षणे आहेत. काही तरुणांना झोपेची समस्या आणि भूकेचे असंतुलनदेखील जाणवते. सततचा मानसिक ताण आणि चिंता व्यक्तीची लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी करू शकते. त्यामुळे अभ्यास, काम आणि वैयक्तिक जीवनावर परिणाम होतो. सामाजिक स्थिती, एकाकीपणा आणि नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. ही अवस्था बराच काळ कायम राहिली तर मनात आत्महत्येचे विचार येण्याचा किंवा नकारात्मक वर्तनाचा धोका वाढू शकतो.

मानसिक आरोग्य बिघडल्याने इतर आजारांचा धोकाही वाढतो. खराब मानसिक आरोग्य केवळ मनापुरते मर्यादित नाही तर त्याचा शरीरावरही खोलवर परिणाम होतो. दीर्घकाळ ताण, नैराश्य, चिंता रक्तदाब आणि हृदय गतीतील असंतुलन निर्माण होणे या स्वरुपात परिणाम दिसू शकतो. यामुळे हृदयरोगांचा धोकाही वाढतो. झोपेचा अभाव आणि सतत मानसिक ताण असल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. स्वाभाविकच शरीर आजारांना बळी पडण्याची शक्यता वाढते. याव्यतिरिक्त सततचा ताणतणाव संप्रेरक कॉर्टिसोल वाढवतो. तो जळजळ, पोट आणि पचन समस्यांना प्रोत्साहन देतो. मानसिक आरोग्य बिघडल्याने मायग्रेन, सततची डोकेदुखी, स्नायूंचा ताण आणि थकवा यासारख्या शारीरिक समस्यादेखील उद्भवू शकतात. शिवाय सततच्या मानसिक ताणामुळे वजन वाढणे किंवा कमी होणे, थकवा, उर्जेचा अभाव आणि सतत अशक्तपणा येऊ शकतो. म्हणूनच मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करण्याची चूक करु नये.



**ते कसे टाळायचे?**

निरोगी दिनचर्या पाळा. दररोज पुरेशी झोप घ्या.

## उच्च रक्तदाबाचा मोठा धोका

माणसाला त्रास देणाऱ्या सर्वात सामान्य आजारांपैकी एक म्हणजे उच्च रक्तदाब होय. त्याला 'सायलेंट किलर' असेही म्हणतात. सुरुवातीला त्यात फारशी लक्षणे दिसत नाहीत; परंतु कालांतराने ती अधिक धोकादायक बनतात. काळजीची बाब म्हणजे उच्च रक्तदाबामुळे डोळ्यांचे आरोग्य बाधित होऊ शकते. म्हणूनच याविषयी विस्ताराने जाणून घेणे गरजेचे ठरते.



केवळ उच्च रक्तदाबच नव्हे तर अनेक रोगांची लक्षणे डोळ्यांद्वारे दिसतात. रेटिनामध्ये होणारे बदल उच्च रक्तदाबाची व्याप्ती दाखवतात आणि इतर अवयवांच्या झालेल्या नुकसानाचे मूल्यांकन करण्यासाठीदेखील याचा उपयोग होऊ शकतो. रेटिनातील लहान रक्तवाहिन्यांवर रक्तदाबातील किरकोळ बदलाचा सहजपणे परिणाम होतो कारण त्या खूप संवेदनशील असतात. रक्तदाब वाढताच लहान रक्तवाहिन्या कडक आणि अरुंद दिसतात. हा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो.

आरोग्यवेध

डॉ. हेमंत राठी

डोळ्यांना किती नुकसान होते?

उच्च रक्तदाब बराच काळ टिकून राहिला तर त्याचे परिणाम डोळ्यांवर स्पष्टपणे दिसून येतात. रेटिनाला नुकसान होऊ लागते. त्याला वैद्यकीय भाषेत 'हायपरटेन्सिव्ह रेटिनोपॅथी' म्हणतात. या काळात रेटिनाच्या धमन्या पूर्वीपेक्षा कडक आणि जाड होतात. हा परिणाम बराच काळ टिकला तर धमन्यांभोवती वायरिंग तयार होऊ लागते. नंतर या कडक झालेल्या धमन्या नसांमध्ये रक्तप्रवाहात अडथळा निर्माण करू शकतात. त्याला 'आर्टे रिओव्हेनस निकिंग' म्हणतात.

## आरोग्यदायी मसाले

प्रत्येक भारतीय मसाल्याची एक खासियत असते. जेवण स्वादिष्ट बनवण्यापर्यंत त्यांचा उपयोग मर्यादित नसतो. आहारात योग्य प्रमाणात समावेश केल्यास हे मसाले आरोग्यासाठी लाभदायक ठरतात. आपल्याला माहीत नसलेल्या अनेक मसाल्यांचे हे आगळे गुणधर्म.

दालचिनीचा वापर पदार्थाची चव दुपटीनं वाढवतो. दालचिनी हा सुगंधी मसाल्याचा प्रकार. रस्सेदार भाज्या, पुलाव तसंच गोड पदार्थांमध्येही दालचिनी घातली जाते. ही दालचिनी मधुमेहींसाठी वरदान ठरू शकते, असं एका संशोधनातून समोर आलंय. शरीर इन्शुलिनचा प्रतिकार करत असेल तर दालचिनीमुळे याला आळा बसू शकतो. म्हणजेच मधुमेह नियंत्रणात दालचिनी महत्त्वाची भूमिका बजावते. तसंच अपचन, सर्दी, जुलाब, रक्ताभिसरणात येणारे अडथळे यावरही दालचिनी उपयुक्त ठरते.



आरोग्यदायी

* लवंग हा असाच एक औषधी पदार्थ. दातांच्या समस्यांवर लवंगाचा वापर हमखास केला जातो. बॅक्टेरियामारक गुणधर्मामुळे दातदुखीत दाढेखाली लवंग ठेवण्याचा सल्ला दिला जातो. जास्त जेवळ झाल्यानंतर अस्वस्थ वाटत असेल तर लवंगेमुळे आराम पडतो. उलट्या, जुलाब, अपचन, पचनसंस्थेतील बिघाड यावर लवंग हा रामबाण उपाय ठरू शकतो.

* जिऱ्यामुळे फोडणीची लज्जत अधिक वाढते. हे साधंसं जीरं अनेक रोगांवरचं औषध ठरू शकतं. पचनसंस्थेच्या तक्रारी, ॲनिमिया आणि सर्दी यावर जीरं लाभदायक ठरतं. मूळव्याधीची समस्या दूर करण्याचे आश्चर्यकारक गुणधर्म जीऱ्यात असतात. जीऱ्यामुळे शरीराला लोह आणि मँगनिज ही खनिजं मिळतात. यामुळे हाडांमध्ये कॅल्शियम शोषलं जातं. तसंच रक्तदाबही नियंत्रणात राहतो.

* बिर्याणी, पुलावची लज्जत वाढवणारी मसाल्याची मोठ्या आकाराची वेलचीही आरोग्यदायी आहे. पचनाच्या तक्रारी तसंच गॅसच्या समस्या असल्यास या वेलचीचं सेवन करावं. गळ्याच्या तक्रारी, छातीत कफ जमणे, दाढ दुखणं या समस्यांवरही मसाल्याची वेलची प्रभावी ठरते.

* केशरात अनेक आरोग्यदायी गुणधर्म असतात. नैराश्य, दृष्टीदोष, विस्मरण यावर केशर प्रभावी ठरतं. पचनाच्या तक्रारींवरही केशर उपकारक आहे. गॅस, बद्धकोष्ठता तक्रारी दूर करण्याची क्षमता काळ्या मिरीत असते.

## ...तर बाळावर प्रतिकूल परिणाम

गरोदरपणात महिलेने आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या काळात दुर्लक्ष केल्याने न जन्मलेल्या बाळाच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. बाळाला हृदयरोगाचा धोकादेखील वाढतो. वैद्यकीय भाषेतया स्थितीला जन्मजात हृदयरोग म्हणतात.

भारतात दरवर्षी दोन लाख मुले हृदयविकाराने ग्रस्त होतात. एकेकाळी हा आजार दुर्मीळ मानला जात होता; परंतु आज भारतासह जगभरातील प्रत्येक शंभर मुलांपैकी अंदाजे आठ मुले जन्मजात हृद्गरोगान्गा कोणत्या ना कोणत्या स्वरूपाने जन्मजात हृदयरोगाने ग्रस्त आहेत. गेल्या तीन वर्षांत कर्नाटकातील अंदाजे ४१ हजार शाळकरी मुले जन्मजात हृदयरोगाने ग्रस्त आढळली आहेत. अर्थातच या आजाराची प्रकरणे संपूर्ण भारतात आहेत.

आरोग्यदायी

डॉ. मेघा पठारे

'इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स'च्या मते, भारतात दरवर्षी दोन लाखांहून अधिक मुले हृदयरोगासह जन्माला येतात. त्यातील पाचपैकी एका मुलामध्ये गंभीर लक्षणे आढळतात. उत्तर भारतीय राज्यांमध्ये याची सर्वाधिक प्रकरणे नोंदवली जातात. खरे पाहता गेल्या दहा वर्षांत देशातील विविध राज्यांमध्ये अनेक हृदयरोग केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. तथापि, बहुतेक खासगी आहेत. तिथे प्रत्येकजण उपचार घेऊ शकत नाहीत.

**मुले हृदयरोगाचे बळी का होतात?**

जन्मजात हृदयरोगात हृदयाच्या विविध आजारांचा समावेश होतो.



यामध्ये हृदयातील छिद्रे, झडपांमध्ये अडथळा आणि हृदयाच्या शिरा चुकीच्या दिशेने वळणे यासारख्या समस्यांची गुंतागुंत वाढते. गर्भधारणेदरम्यान काही समस्याही या आजाराला कारणीभूत ठरू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या महिलेला गर्भधारणेदरम्यान नियंत्रणाबाहेर मधुमेह असेल तर ही स्थिती विकसित होण्याचा धोका असतो. त्याचप्रमाणे गर्भधारणेदरम्यान अनियंत्रित थायरॉईड रोग किंवा जास्त प्रमाणात औषधांचा वापरदेखील हा धोका वाढवतो.

## फ्लूकडे दुर्लक्ष नको


फ्लू हा सर्वसाधारण विकार आहे. तो हंगामी विषाणूंमुळे होतो. यात सौम्य ते तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसून येतात. काही रूग्ण आठवडाभरात बरे होतात तर काही रूग्णांमध्ये बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ६५ वर्षांपुढच्या रूग्णांमध्ये गुंतागुंतीची शक्यता बरीच जास्त असते. ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झालेली असते. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे शरीर विषाणूंना प्रतिकार करू शकत नाही. फ्लूचा संसर्ग वाढला तर त्याचं रूपांतर निमोनियात होऊ शकतं. निमोनिया झालेल्या रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागतं. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.

आरोग्य चर्चा

फ्लू आणि सर्वसामान्य सर्दी यात फरक असतो. आजारी पडल्यानंतर फ्लू आणि सर्दी यातला फरक जाणून घेणं गरजेचं आहे. फ्लू आणि सर्दी यांची लक्षणं सारखीच असली तरी सर्दीची लक्षणं बरीच सौम्य असतात तर फ्लूची बरीच लक्षणं साध्या सर्दीत दिसून येत नाहीत.

**फ्लू आणि सर्दीची लक्षणं**

नाक गळणं, छातीत कफ साठणं, घसा दुखणं, खोकला ही सर्दी आणि फ्लूची सर्वसाधारण लक्षणं आहेत. फ्लू असेल तर अतिरिक्त लक्षणं दिसून येतात. त्यात ताप, अंगदुखी, थंडी, थकवा, अशक्तपणा, अस्वस्थता जाणवणं, तीव्र डोकेदुखी यांचा समावेश आहे.



६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना ही लक्षणं जाणवली तर पुढची गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. फ्लूची लक्षणं दिसल्यानंतर ४८ तासांत आराम दिसला नाही तर डॉक्टर तुम्हाला विषाणूविरोधी औषधं घेण्याचा सल्ला देतात. वेळेत औषधं घेतली तर फ्लूची तीव्रता कमी होऊ शकते.

तरूण तसंच सशक्त असणाऱ्या लोकांमध्ये फ्लूमुळे फारशी गुंतागुंत निर्माण होत नाही. कारण त्यांची रोगप्रतिकारक शक्ती चांगली असते. पण ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये फ्लूमुळे बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

## तिशीनंतर गर्भधारणा गुंतागुंतीची

करिअर, जीवनशैली आणि वैयक्तिक प्राधान्यांमुळे अनेक महिला लग्न आणि गर्भधारणेचे नियोजन करण्यास उशीर करतात. तथापि, वयाची ३० वर्षे ओलांडल्यानंतर अनेकींना गर्भधारणेशी संबंधित बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागते. वयानुसार स्त्रीच्या शरीरातील पुनरुत्पादक आरोग्यावर, हार्मोनलमध्ये बदल होतात. म्हणूनच महिलांनी वेळेवर आणि अचूक माहिती मिळवणे तसेच गर्भधारणेचे नियोजन करण्यापूर्वी आरोग्याकडे विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे.



तिशीनंतर स्त्रीच्या मासिक पाळी चक्रामध्ये बदल होऊ लागतो. यामुळे ओव्हुलेशनची (अंडीची निर्मिती आणि प्रकाशन) वारंवारिता कमी होते. ओव्हुलेशन नियमित नसते तेव्हा गर्भधारणेमध्ये अडचणी येऊ शकतात. शिवाय या वयात एएमएच (अँटी-मुलेरियन हार्मोन) ची पातळी देखील कमी होऊ लागते. हा हार्मोन अंडाशयातील अंड्यांची संख्या आणि गुणवत्ता प्रतिबिंबित करतो. 'एएमएच' पातळी कमी झाल्यामुळे प्रजनन क्षमता कमी होते आणि गर्भधारणा लांबू शकते.

विचारा प्रश्न

डॉ. दीप्ती नेने

**हार्मोनल बदल आणि अनियमित मासिक पाळी**

वयाच्या तिशीनंतर महिलांमध्ये संप्रेरकांमधील असंतुलन ही एक सामान्य समस्या बनते. यामुळे मासिक पाळी लवकर किंवा उशिरा येऊ शकते. अनियमित मासिक पाळीमुळे गर्भधारणेचे नियोजन करणे कठीण होऊ शकते खेरीज संप्रेरकांमधील असंतुलन कधीकधी 'पीसीओएस' (पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम) सारख्या समस्याही निर्माण करू शकते. त्यामुळे गर्भधारणा अधिक कठीण होऊ शकते.

**आव्हाने कोणती?**

वयानुसार अंड्यांची गुणवत्ता कमी होऊ लागते. संशोधन सूचित करते की ३० वर्षांनंतर गर्भपाताचा धोका वाढतो. या वयात मधुमेह, रक्तदाब आणि थायरॉईड यासारख्या समस्यादेखील गर्भधारणा गुंतागुंतीची करू शकतात. म्हणूनच गर्भधारणा नैसर्गिकरित्या होत नसेल तर कृत्रिम पुनरुत्पादन तंत्रांची आवश्यकता भासते.


**मुल जन्माला घालण्याचे योग्य वय?**

२५ ते ३० हे स्त्रीसाठी गर्भधारणेचे सर्वात योग्य मानले जाते. या काळात तिचे शरीर निरोगी असते. अंड्यांची गुणवत्ता चांगली असते आणि संप्रेरकेदेखील इष्टतम असते.

# अभ्यंगस्नान

गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना 'अभ्यंगस्नान' करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. या लेखात आपण 'अभ्यंगस्नान' म्हणजे काय, त्याची प्रत्यक्ष कृती, त्याने होणारे लाभ, अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.



**१. अभ्यंगस्नान : अर्थ**

अ. अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे

आ. शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान.

इ. पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान

**२. वर्षभरात अभ्यंगस्नान करण्याचे दिवस**

अ. संवत्सरारंभ

आ. वसंतोत्सवाचा प्रारंभ दिवस म्हणजे फाल्गुन कृष्ण प्रतिपदा

इ. दिवाळीचे तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी अर्थात नरक चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा.

**३. अभ्यंगस्नानात तेल लावण्याचे महत्त्व**

अभ्यंगाने, म्हणजेच स्नानापूर्वी तेल लावण्याने पिंडातील चेतनेतील प्रवाहाला अभंगत्व, म्हणजेच अखंडत्व प्राप्त होते. स्नानापूर्वी देहाला तेल लावल्याने पेशी, स्नायू आणि देहातील पोकळ्या जागृत अवस्थेत येऊन पंचप्राणांना कार्यरत करतात. पंचप्राणांच्या जागृततेमुळे देहातील टाकाऊ वायू ढेकरा, जांभया इत्यादींद्वारे बाहेर पडतात. यामुळे देहातील पेशी, स्नायू आणि अंतर्गत पोकळ्या चैतन्य ग्रहण करण्यात संवेदनशील बनतात. हा टाकाऊ वायू किंवा देहात घनीभूत झालेली उष्ण टाकाऊ ऊर्जा कधी कधी लहरींच्या रूपात डोळे, नाक, कान आणि त्वचेची रंध्रे यांतून बाहेर पडते; म्हणून तेल लावून झाल्यावर कधी कधी डोळे आणि मुख (चेहरा) लाल होतो.'

**४. अभ्यंगस्नान केल्याने होणारे लाभ**

४ अ. अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक लाभ : त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही.

४ आ. अभ्यंगस्नानामुळे होणारे आध्यात्मिक लाभ : स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो. अभ्यंगस्नानाचे अन्यही बरेच आध्यात्मिक लाभ आहेत.

**५. अभ्यंगस्नानाची कृती**

तेल, उटणे आणि त्यांचे मिश्रण

व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात.

**दिवाळीत अंगाला उटणे लावण्याची पद्धत**

दिवाळीतील अभ्यंगस्नानात उटण्याला विशेष महत्त्व आहे. उटणे अंगाला लावण्याची पद्धत कशी असावी, याचे विश्लेषण येथे देत आहोत. उटणे हे रजोगुणी तेजोमय असल्याने ते अंगाला लावतांना घड्याळाच्या काट्याच्या दिशेने बोटांच्या अग्रभागाचा अंगाला स्पर्श करून थोडेसे दाबून लावावे. प्रत्येक ठिकाणी दिलेली उटणे लावण्याची पद्धत त्या त्या पोकळीत असणाऱ्या त्रासदायक वायूंच्या गतीला अनुसरून दिली आहे.

**अ. स्वतःला उटणे लावणे**

**१. कपाळ :** कपाळावर लावतांना मधल्या तीन बोटांचा उपयोग करून स्वतः लावतांना डावीकडून उजवीकडे या पद्धतीने लावावे.

**२. कपाळाच्या दोन्ही टोकांना बाजूला भुवईजवळ :** येथे लावतांना ते बोटांच्या अग्रभागांनी डावीकडून उजवीकडे (खालून वरच्या दिशेने), तसेच उजवीकडून डावीकडे (वरून खालच्या दिशेने) चोळून लावावे.

**३. डोळ्यांच्या पापण्या :** यांवर लावतांना नाकाकडून कानाकडे हात फिरवावा.

**४. नाक :** याला लावतांना उजव्या हाताच्या अंगठा आणि तर्जनी यांनी नाकाच्या दोन्ही बाजूंनी खालच्या दिशेने उतरत यावे अन् खाली आल्यावर उटण्याचा वास घ्यावा. उटण्याच्या वासातून प्रक्षेपित होणारा तेजाशी संबंधित गंध फुफ्फुसांतील वायूकोषात गेल्याने तेथील काळे आवरण नष्ट होण्यास साहाय्य होते.

**५. मुखाचा वरचा भाग :** या भागातून, म्हणजेच नाकाच्या खालून मधली तीन बोटे ठेवून आरंभ करून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने मुखाभोवती गोल, म्हणजेच हनुवटीच्या खड्ड्यातून वर स्वतःच्या डावीकडे जाऊन मुखाभोवतीचा गोल पूर्ण करावा.

**६. गालांच्या पोकळी :** गालाच्या मध्यभागातून आरंभ करून घड्याळाच्या काट्याप्रमाणे बोटांची अग्रे गोल गोल फिरवून लावावे.

**७. कानाची पाळी :** ही तर्जनी आणि अंगठा यांमध्ये धरून तिथल्या तिथे हलवून उटणे लावावे.

**८. दोन्ही कान :** दोन्ही कान हातांनी पकडून कानाच्या मागच्या बाजूला फक्त अंगठा ठेवून खालून वरच्या दिशेने फिरवावा.

**९. मान :** मानेच्या मागून मध्यातून दोन्ही हातांची बोटे पुढे विशुद्ध चक्राकडे आणणे

**१०. छाती आणि पोट यांचा मध्यभाग :** उजव्या हाताच्या तळव्याने छातीच्या मध्यरेषेवर वरून खालच्या दिशेने नाभीकडे हात फिरवत आणणे.

**११. काखेपासून कमरेपर्यंत :** काखेपासून पितृतीर्थासारखा हात, म्हणजेच अंगठा एका बाजूला अन् चार बोटे दुसर्‍या बाजूला ठेवून अंगाच्या दोन्ही बाजूच्या रेषेवरून वरून खाली या पद्धतीने फिरवावेत.

**१२. पाय आणि हात :** हाताची बोटे फिरवत पायांवर आणि हातांवर वरून खालच्या दिशेने उटणे लावावे.

**१३. पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषा :** पावलाच्या आणि पायाच्या जोडरेषेवर अंगठा अन् तर्जनी यांनी विळखा घालून तो भाग कड्यासारखा घासावा.

**१४. डोक्याच्या मध्यभागी :** डोक्याच्या मध्यभागी तेल लावून ते हाताने घड्याळाच्या काट्याप्रमाणे फिरवावे.

**आ. दुसऱ्या व्यक्तीला उटणे लावणे**

**१. पाठ :** दुसऱ्या व्यक्तीच्या पाठीला उटणे लावतांना पाठीच्या मणक्याच्या रेषेशी दोन्ही हातांच्या बोटांची अग्रे येतील अशा पद्धतीने वरून खालच्या दिशेने दोन्ही हात एकाच वेळी फिरवावेत.

**२. कंबर :** दुसऱ्या व्यक्तीला लावतांना कमरेच्या आडव्या रेषेवर पाठीकडून तिच्या डाव्या बाजूकडून उजवीकडे येऊन परत उजवीकडून डावीकडे जावे. असे परत परत लावावे.

**५ अ. देशकालकथन**

**अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करावे लागते.**

**५ आ. देशकालकथनाचे महत्त्व**

'ब्रह्मदेवाचा जन्म झाल्यापासून आतापर्यंत ब्रह्मदेवाची किती वर्षे झाली; कोणत्या वर्षातील कोणते आणि कितवे मन्वंतर चालू आहे; या मन्वंतरातील कितवे महायुग आणि त्या महायुगातील कोणते उपयुग चालू आहे, या सर्वांचा उल्लेख देशकालकथनात असतो. यावरून यापूर्वी केवढा मोठा काळ गेला आहे आणि राहिलेला काळही केवढा मोठा आहे, याची कल्पना येते. 'आपण फार मोठे आहोत', असे प्रत्येकाला वाटत असते; पण 'आपण किती लहान तथा सूक्ष्म आहोत', याची कल्पना या विश्वाच्या अफाट काळावरून येते. यामुळे माणसाचा गर्व नाहीसा होतो.'

**संदर्भ :** सनातन संस्थेचे ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते' आणि 'दिनचर्येशी संबंधित आचार आणि त्यांमागील शास्त्र'

**संकलन– परमेश्वर गायकवाड, सनातन संस्था**

# नरक चतुर्दशीचे महत्त्व आणि अध्यात्मशास्त्र




आश्विन वद्य चतुर्दशीला नरकासुर राक्षसाच्या वधाप्रित्यर्थ दिवाळीतील या सणाच्या दिवशी पहाटे सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान केले जाते. या दिवशी यमदीपदान करून ब्राह्मणांना भोजन आणि वस्त्रांचे दानही दिले जाते. या सणाचे महत्त्व आणि या दिवशी करण्यात येणाऱ्या कृतींमागील शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.

**१. इतिहास :** 'श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे – पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट दैत्य स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला.

**२. सण साजरा करण्याची पद्धत :** अभ्यंगस्नान – गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना 'अभ्यंगस्नान' करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे, शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान. पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान.

आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने डोक्यापासून पायापर्यंत आणि पुन्हा डोक्यापर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाड्याची वनस्पती वापरतात. आघाडा वनस्पती उपलब्ध न झाल्यास देवाला प्रार्थना करून स्नान करावे. व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात. अभ्यंगस्नासाठी उटणे उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी खोबरेल तेलात हळद घालून ते अंगाला लावावे.

**अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक आणि आध्यात्मिक लाभ –** त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही. स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो.

**यमतर्पण –** अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण करण्यास सांगितले आहे. हा तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो. त्याप्रमाणे विधी करावा. त्यानंतर आई मुलांना ओवाळते. काही जण अभ्यंगस्नानानंतर नरकासुराच्या वधाचे प्रतीक म्हणून कारीट (एक प्रकारचे कडू फळ) पायाने ठेचून उडवतात, तर काही जण त्याचा रस (रक्त) जिभेला लावतात.

दुपारी ब्राह्मणभोजन घालतात आणि वस्त्रदान करतात. ब्राह्मणभोजन घालणे आणि वस्त्रदान करणे शक्य नसल्यास अर्पणाचा सदुपयोग होईल, अशा ठिकाणी किंवा धार्मिक कार्य करणार्‍या संस्थांना काही रक्कम अर्पण करावी.

प्रदोषकाळी दीपदान करतात. ज्याने प्रदोषव्रत घेतले असेल, तो प्रदोषपूजा आणि शिवपूजा करतो.

**संदर्भ :** सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

**संकलन– परमेश्वर गायकवाड, सनातन संस्था**

# अंधःकारातून प्रकाशाकडे :
## अंधश्रद्धा निर्मूलनाचा समाजशास्त्रीय प्रवास

अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक श्रद्धेची किंवा धार्मिक भावनेची बाब नाही; ती आपल्या समाजाच्या संरचनेत, संस्कृतीत आणि सत्तासंबंधांमध्ये खोलवर रुजलेली सामाजिक वास्तवता आहे. भारतीय समाजशास्त्रीय जीवनाचा अभ्यास केल्यास दिसते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचा परस्परसंबंध हा मानवाच्या सामाजिक व मानसिक गरजांशी निगडित आहे. श्रद्धा व्यक्तीला आधार देते, आशा देते, पण विवेकशून्य श्रद्धा म्हणजेच अंधश्रद्धा समाजाला अंधारात ढकलते. इमाईल दुर्खीमच्या 'सामूहिक चेतना' या संकल्पनेप्रमाणे समाजातील विश्वास प्रणाली ही एकात्मतेचे साधन असते; परंतु जेव्हा ही चेतना अज्ञान, भीती आणि सत्तेच्या रचनेशी गुंतते, तेव्हा ती दमनाचे साधन बनते.

भारतीय समाजात अंधश्रद्धेचा इतिहास प्राचीन धार्मिक संस्कृतीशी जोडलेला आहे. ग्रहदोष, अपशकुन, शुद्ध-अशुद्धतेचे निकष, जातिव्यवस्था, स्त्रीविषयक बंधने या सर्वांनी समाजात रूढ झालेल्या श्रद्धांना 'दैवी सत्य' म्हणून मान्यता दिली. काळ जसजसा पुढे गेला तसतसे विवेक व तर्क यांची जागा अंधश्रद्धेने घेतली. समाजात स्त्रियांवर झालेली अन्यायपूर्ण बंधने, मासिक पाळीशी निगडित अपवित्रतेचे समज, विधवांना समाजातून बहिष्कृत करणे, 'डायन' ठरवून महिलांवर अत्याचार करणे या सर्व घटना समाजाच्या सांस्कृतिक अधोगतीचे द्योतक ठरल्या. या अंधश्रद्धांना ब्रिटिशकालीन समाजसुधारकांनी आणि नंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार, महात्मा गांधी अशा समाजप्रबोधनकारांनी आव्हान दिले. त्यांनी विज्ञानाधारित विचारसरणी, शिक्षण आणि समानतेचा पुरस्कार करून समाजात विवेकवाद रुजवला.

तथापि, आधुनिक भारतात अंधश्रद्धा संपलेली नाही; ती नव्या स्वरूपात जिवंत आहे. आज अंधश्रद्धा बाजारपेठेतून विकली जाते. तंत्र-मंत्र, ग्रहदोष, वास्तुशास्त्र, अंकशास्त्र, ऑनलाइन भविष्यवाणी, चमत्कार विक्री हे त्याचे आधुनिक रूप आहे. या नव्या अंधश्रद्धा शिक्षित वर्गालाही जखडतात, कारण त्या भीती आणि असुरक्षिततेवर पोसल्या जातात. समाजशास्त्रीय विश्लेषणानुसार अंधश्रद्धा टिकते कारण ती समाजातील सत्ता-संबंधांना पूरक ठरते. धर्म, जात आणि लिंग या रचनेतून मिळणाऱ्या सत्तेचा लाभ घेणारे घटक अंधश्रद्धेचे पोषण करतात. दैवी इच्छा, कर्मफळ, ग्रहदोष अशा संकल्पनांद्वारे लोकांना विद्यमान असमानतेला नैसर्गिक मान्यतेचे रूप दिले जाते. गरीब माणूस आपल्या दारिद्र्याला देवाची शिक्षा मानतो, स्त्री आपली दुय्यम स्थिती कर्माचा परिणाम मानते, आणि अशा प्रकारे अंधश्रद्धा विषमता टिकवते.

सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, परंपरा आणि अंधश्रद्धा यांचा घनिष्ट संबंध आहे. परंपरा सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असली, तरी जेव्हा ती प्रश्न विचारण्यास नकार देते, तेव्हा ती अंधश्रद्धेत रूपांतरित होते. परंपरा व्यक्तीला सांत्वन देते, पण जेव्हा ती विवेकावर पडदा टाकते, तेव्हा सामाजिक प्रगती थांबते. भारतीय समाजात अनेक पारंपरिक विधी आणि सण सामाजिक संबंध दृढ करतात, पण त्याचबरोबर काही रूढी आरोग्य, शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि सामाजिक निर्णयक्षमतेवर मर्यादा घालतात. या रूढींच्या व्यावसायिकीकरणामुळे अंधश्रद्धा आज उद्योग बनली आहे, चमत्कार विक्री, पूजा-पाठांचे पॅकेज, शुभरंग, वास्तु उपाय, रत्नधारण या साऱ्यांनी विवेकाचा व्यापार सुरू केला आहे. म्हणूनच बदलाचा मार्ग म्हणजे परंपरेचा नकार नव्हे, तर तिचे तर्कसंगत पुनर्निर्देशन होय.

अंधश्रद्धेचे आर्थिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. समाजातील गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्यसेवेची अनुपलब्धता या सर्व गोष्टी अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. असुरक्षिततेच्या काळात व्यक्तीला आपले प्रश्न दैवी कारणांतच उत्तर दिसते. ग्रामीण भारतात अजूनही आजारपणाला देवदंड मानले जाते, आणि झाडफुंक, बळी, तांत्रिक विधी अशा अवैज्ञानिक उपचारांचा अवलंब केला जातो. या परिस्थितीत तांत्रिक, ज्योतिषी आणि ढोंगी बाबांचा उदय होतो, जे लोकांच्या भीतीचा व्यापार करतात. त्यामुळे अंधश्रद्धा ही केवळ श्रद्धा नसून आर्थिक शोषणाचे साधन बनते. सामाजिक विषमतेत ती सत्ताधारी घटकांना आपला अधिकार टिकवून ठेवण्यासाठी एक वैध साधन पुरवते.

अंधश्रद्धेचा स्त्रियांच्या जीवनावर विशेषतः भयावह परिणाम होतो. अनेक समाजांमध्ये महिलांना डायन, मंगळिक, अपशकुनी अशा लेबलांनी ओळखले जाते. अशा महिलांवर सामाजिक बहिष्कार, अत्याचार, मालमत्तेतील हक्क नाकारणे आणि आरोग्यसेवेपासून दूर ठेवणे ही सामान्य बाब आहे. पियर बोरद्यूच्या 'प्रतिकात्मक हिंसाचार' या संकल्पनेनुसार, अशा अंधश्रद्धात्मक आरोपांद्वारे समाज स्त्रियांचे स्वायत्त अस्तित्व नियंत्रित करतो. ही हिंसा नेहमी शारीरिक नसते; ती मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपात होते. म्हणूनच अंधश्रद्धेविरुद्धच्या लढ्यात स्त्रीशिक्षण, आरोग्यसेवा, आर्थिक स्वावलंबन आणि समुदायस्तरीय संवाद ही महत्त्वाची साधने आहेत.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी विज्ञान आणि तर्कशक्ती हाच सर्वात प्रभावी पर्याय आहे. विज्ञान माणसाला प्रश्न विचारायला शिकवते, निरीक्षणाद्वारे सत्य तपासायला प्रवृत्त करते. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी तुम्ही मानायला मोकळे आहात, पण तपासायला विसरू नका हा अत्यंत क्रांतिकारी संदेश दिला, जो विवेकवादाच्या चळवळीचा पाया ठरला. त्यांच्या या विचारसरणीने धार्मिक आंधळेपणा, तंत्र-मंत्र आणि ग्रहदोष यांसारख्या गैरवैज्ञानिक समजुतींना थेट सामाजिक आव्हान दिले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ (अ)(ह) मध्येही प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि सुधारक वृत्ती जोपासावी, असे स्पष्टपणे नमूद आहे. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन आणि काळी जादू प्रतिबंध कायदा, २०१३ हा याच दिशेने उचललेला ऐतिहासिक पाऊल ठरला आहे.

शिक्षण आणि माध्यमे ही अंधश्रद्धा निर्मूलनाची दोन अत्यावश्यक स्तंभ आहेत. शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशक्ती आणि विवेकवाद यांचा समावेश करणे आवश्यक आहे. माध्यमांनी देखील लोकजागृतीची जबाबदारी ओळखली पाहिजे. दुर्दैवाने, काही माध्यमे अंधश्रद्धेला बळ देतात, भविष्य सांगणारे कार्यक्रम, ज्योतिष सल्ले, आणि चमत्कारांचे प्रक्षेपण समाजाच्या विवेकाला भ्रमित करतात. उलट, विज्ञानाधारित माहितीपट, विवेकवादी चर्चा आणि सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील बौद्धिक वातावरण समृद्ध करू शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ व्यक्तिगत नव्हे तर सामूहिक प्रक्रियाही आहे. समाजातील बदल सामूहिक चेतनेवर अवलंबून असतो. म्हणून ग्रामपंचायतींपासून विद्यापीठापर्यंत विवेक मंच, विज्ञान मेळावे, लोकशिक्षण आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासन, शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, आणि सामान्य नागरिक यांचा सहभाग अत्यावश्यक आहे. अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठा अडथळा आहे. ती व्यक्तीची विचारशक्ती कुंठित करते आणि समाजाला स्थैर्याऐवजी अस्थिरता आणते. समाजशास्त्रीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहता, अंधश्रद्धा निर्मूलन ही केवळ मोहीम नाही, तर ती सामाजिक क्रांती आहे. शिक्षण, विज्ञान, तर्कशक्ती आणि विवेक या चार आधारस्तंभांवरच समाजाचा प्रकाशमान भविष्यकाळ उभा राहू शकतो. अंधःकारावर प्रकाशाचा विजय तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा प्रत्येक मनात विवेकाचा दिवा पेटेल आणि हा दिवा ज्ञानाचा, विज्ञानाचा आणि मानवतावादाचा असेल.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# डिप्रेस्ड क्लास मिशन
## अस्पृश्यतेविरुद्धची सामाजिक लढाई

१८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन झालेल्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ने भारतीय समाज सुधारणा चळवळीत एक ऐतिहासिक टप्पा निर्माण केला. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या संस्थेचा मुख्य उद्देश अस्पृश्यता निर्मूलन, दलित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी कार्य करणे हा होता. त्या काळातील भारतीय समाज गहन जातीभेद आणि अस्पृश्यतेच्या अंधश्रद्धेच्या कचाट्यात होता. बहुतेक दलित लोकांना मुलांना शिक्षण मिळत नसे, रोजगाराच्या संधी अत्यल्प होत्या आणि समाजातील समानतेचा विचार जवळपास अस्तित्वातच नव्हता. या पार्श्वभूमीवर 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना समाजातील प्रगतिशील विचारसरणी आणि सामाजिक न्यायाची गरज लक्षात घेऊन झाली.

'डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेसाठी 'प्रार्थना समाज' आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरला. १९०७ मध्ये 'पारेल' येथे पहिली शाळा सुरू करून मिशनने दलित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी दिली. शिक्षणाद्वारे समाज बदलण्याचा हा प्रयत्न त्या काळात अत्यंत धाडसी मानला जात होता. शिक्षण ही केवळ ज्ञान मिळवण्याची संधी नव्हती, तर सम ाजातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्याचे महत्त्वाचे साधनही ठरले. मुलांना मिळालेल्या शिक्षणामुळे त्यांचा आत्मसन्मान वाढला आणि समाजातील अन्य लोकांबरोबर समानतेचा अनुभव त्यांना लाभला.

'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे उद्दिष्ट केवळ शिक्षणापुरते मर्यादित नव्हते; सामाजिक सुधारणा, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समता या क्षेत्रातही मिशनने ठोस काम केले. अस्पृश्यतेविरुद्ध जनजागृती करण्यासाठी विविध सभा, चर्चासत्रे आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले गेले. लोकांना सामाजिक समतेचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला गेला. समाजातील जुनाट रूढी, जसे की अस्पृश्यतेवर आधारित छळ, जातीव्यवस्थेतील असमानता आणि स्त्रियांवरील भेदभाव, यांचा विरोध करण्यासाठी मिशनने ठोस पावले उचलली.

शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी ही मिशनची अत्यंत महत्त्वाची बाजू ठरली. दलित मुलांना शिक्षण देऊन नोकरी व आर्थिक संधी उपलब्ध करून देणे तसेच समाजात प्रतिष्ठा मिळवून देणे हे मिशनचे प्राथमिक उद्दिष्ट होते. मिशनच्या शाळांमध्ये मुलांना केवळ पारंपरिक शिक्षणच नव्हे, तर सामाजिक मूल्ये, मानवाधिकार, आत्मसन्मान आणि समानतेचा संदेश दिला जात असे. या शाळांमुळे दलित मुलांचा आत्मविश्वास वाढला आणि समाजातील इतर वर्गांसोबत त्यांचा समन्वय सुधारला.

आर्थिक सक्षमीकरण हे मिशनचे आणखी एक महत्त्वाचे अंग होते. दलित समाजातील लोकांना व्यवसाय प्रशिक्षण, हस्तकला, आणि इतर कौशल्ये शिकवून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या. यामुळे आर्थिक स्थिती सुधारली तसेच समाजातील आत्मसन्मान आणि स्वावलंबनाची भावना विकसित झाली. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजातील लोकांनी आपले हक्क सुरक्षित करण्यास प्रोत्साहन मिळाले आणि सामाजिक भेदभावाविरुद्ध उभे राहण्याची क्षमता वाढली.

धार्मिक समता ही मिशनची आणखी एक महत्त्वाची भूमिका ठरली. धर्मांच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला विरोध करून सर्व धर्मांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा संदेश मिशनने दिला. मिशनच्या कार्यामुळे समाजात धार्मिक समतेविषयी जागरूकता वाढली आणि दलित समाजाला सामाजिक न्यायाच्या मार्गावर टाकण्यास मदत झाली.

समाजावर मिशनच्या कार्याचा खोल परिणाम दिसून आला. शिक्षणामुळे दलित मुलांना उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झाली. सामाजिक जनजागृतीमुळे अस्पृश्यता विरोधी चळवळींना चालना मिळाली आणि समाजातील वाईट रूढी, भेदभाव व असमानतेवर खुलासा झाला. आर्थिक सक्षमीकरणामुळे दलित समाजाचे व्यक्ती स्वावलंबी झाले आणि त्यांनी समाजातील निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. धार्मिक समतेच्या प्रचारामुळे समाजातील सामूहिक सहिष्णुता वाढली आणि भेदभावाच्या प्रथा कमी होऊ लागल्या.

आजही 'डिप्रेस्ड क्लास मिशन'चे महत्त्व कमी झालेले नाही. स्थापनेपासून जवळपास ११८-११९ वर्षांनंतरही त्याचे उद्दिष्ट आणि कार्य समाज सुधारण्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत. शैक्षणिक संस्था, वाचनालये, सामाजिक कार्यक्रम आणि आरोग्य सेवा केंद्रे मिशनच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. मिशनच्या कार्यामुळे निर्माण झालेला सामाजिक वारसा आजच्या काळातही दलित समाजाच्या उन्नतीसाठी प्रेरणा देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ही केवळ सामाजिक संस्था नाही, तर सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवणारा प्रबळ यंत्र आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, समाजातील समता, आर्थिक सक्षमीकरण आणि धार्मिक समतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनच्या सामाजिक कार्याचे मूळ आधार आहेत. दलित समाजाची उन्नती आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे मिशनचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे, जे आजही समाज सुधारणा चळवळीतील प्रेरक ठरते.

डिप्रेस्ड क्लास मिशनच्या स्थापनेचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रातही खोलवर पडला. दलित समाजाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आत्मसन्मान वाढवण्यासाठी, आणि समाजातील असमानता कमी करण्यासाठी मिशनचे कार्य अद्वितीय ठरले. आजही या मिशनच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या शाळा, व्यावसायिक प्रशिक्षण संस्था आणि सामाजिक कार्यक्रम दलित समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देत आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, डिप्रेस्ड क्लास मिशनने भारतीय समाजात जातीय असमानतेविरुद्ध एक ठोस यंत्र तयार केले. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक जागरूकता आणि धार्मिक समतेवर आधारित या यंत्रामुळे समाजातील दलित समाजाला स्वतःचे हक्क मिळवण्याची क्षमता प्राप्त झाली. यामुळे समाजात समानतेवर आधारित नवे धोरण आणि विचारसरणी रुजली, जी आजही कार्यरत आहे.

निष्कर्षतः, डिप्रेस्ड क्लास मिशन ही सामाजिक परिवर्तनाची प्रेरक संस्था आहे. अस्पृश्यतेविरुद्धचा संघर्ष, दलित समाजाची उन्नती, आणि समाजातील समानतेसाठी केलेले प्रयत्न हे मिशनचे मूलभूत ध्येय आहेत. १८ ऑक्टोबर रोजी या मिशनचा स्थापना दिन साजरा करून समाजातील समानतेची आणि सामाजिक न्यायाची जाणीव वाढवणे आवश्यक आहे. महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या कार्यामुळे दलित समाजाच्या उन्नतीसाठी स्थिर पाया रचला गेला आहे आणि आजही त्याचा सामाजिक वारसा समाजात उजळून दिसतो.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



गुरुकुल कॅम्पसमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करताना विद्यार्थी व शिक्षक.

# गुरुकुल कॅम्पसमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी

नगर – तपोवन रोड येथील गुरुकुल कॅम्पस–मधील डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक विद्यालय नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी ओळखले जाते. यंदाही विद्यार्थ्यांनी दिवाळीचे पावित्र्य जपताना पर्यावरण रक्षणाची सामाजिक बांधिलकी जपली आहे. विद्यालयात नुकत्याच झालेल्या पर्यावरणपूरक दिवाळी सणाच्यानिमित्ताने आकाश कंदील, मातीच्या पणत्या व भेटकार्ड बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी आपले सुप्त, सुर्जनशीलता आणि कलात्मकता दाखवून दिली.

यासाठी विद्यालयात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत बनवलेले सुंदर इको–फ्रेंडली आकाश कंदील आणि आकर्षक पणत्या हे विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नाचे प्रतिक होते. मुख्याध्यापिका कुंदा झोंड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना कलेचे शिक्षण व पर्यावरणाचे महत्त्व समजून सांगण्यात आले.

या स्पर्धेत प्रथम, द्रितीय व तृतीय क्रमांक काढून विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक करण्यात आले. कलाशिक्षिका योगिता माहिते विद्यालयातील शिंदे शिल्पा, कडूस शितल, शेख सबा, बोरुडे प्रियंका, निमसे अमोल, गवारे अभिजित, शेख सबीहा, शेख सानिया, शिंगाडे मनीषा, ममता कोरी, राधा चौधरी, आस्मा बेग, पूजा झरेकर, सविता शेळके, अक्षय बोरुडे, सलमान पठाण, आसिफ पठाण, ज्योती मुर्तडकर यांनी परिश्रम घेतले.

# 'रामकृष्ण अर्बन'च्या सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ



वसु बारस या दिनी रामकृष्ण अर्बन च्या प्रातिनिधिक स्वरुपात निमंत्रित सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाच्या शुभारंभ प्रसंगी रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीचे संस्थापक श्रीगोपाल धूत, चेअरमन किसनलाल बंग, व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू आदींसह संचालक मंडळ व सभासद उपस्थित होते.

नगर – दरवर्षीप्रमाणे वसु बारस या दिनी रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीच्या प्रातिनिधिक स्वरूपात निमंत्रित सभासदांना १५ टक्के लाभांश वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सोसायटीचे संस्थापक श्रीगोपाल धूत, चेअरमन किसनलाल बंग, व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, संचालक राजेंद्र गुजराथी, प्रदीप पंजाबी, सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, गोपाल मणियार, मधुसूदन सारडा, ॲड. अशोक बंग, राजेंद्रकुमार कंत्रोड, राजकमल मनियार, शोभा राठी, देवराव साठे, साईनाथ कावट आदींसह संस्थेचे सभासद सतीश चोपडा, उद्योजक अशोक खंडेलवाल, राजेंद्र बिहाणी, राजेंद्र गुजराथी, सुरेश धामट, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, उप व्यवस्थापक कुमार आपटे आदी उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी स्वागत केले. सभासदांचा भक्कम पाठिंबा, आजी–माजी संचालकांचे पाठबळ व सर्व संस्थेचे कर्मचारी यांचे उत्कृष्ट कार्य आणि श्रीगोपाल धूत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याने रामकृष्ण अर्बन ची प्रगती होत आहे.संस्थेने आर्थिक प्रगती सोबत सामाजिक कार्यातही पुढाकार घेतला आहे. सभासदांच्या हिताचा विचार करता निरंतर संस्थेने १५% लाभांश वाटप केले आहे, असे चेअरमन किसनलाल बंग यांनी सांगितले.

श्रीगोपाल धूत म्हणाले, सभासद हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत. तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ कुठलाही मिटींग भत्ता व मानधन न घेता विना मोबदला निस्वार्थ पणे संस्थेच्या हितासाठी अहोरात्र कार्य करीत आहेत. सभासदांचा भक्कम विश्वास व संचालक मंडळांचा पारदर्शी कारभार यामुळे संस्थेची प्रगती होत आहे. संस्थेच्या एकूण उत्पन्नापैकी पंधरा टक्के सभासदांना लाभांश वाटप, दहा टक्के समाजकार्य व दहा टक्के सभासदांच्या कार्यासाठी तर ६५ टक्के संस्थेचा पाया भक्कम होण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

प्रास्ताविकात संचालक लक्ष्मीकांत झंवर म्हणाले, संस्थेला यंदाच्या वर्षी चार कोटी पंधरा लाख रुपयांचा निव्वळ नफा झालेला आहे. संस्थेने सभासदांना निरंतर १५ टक्के लाभांश दिला आहे. आजच्या कार्यक्रमाच्या निमंत्रित सभासदांना संस्थेविषयी माहिती मिळावी. यासाठी सभासदांना बोलविण्यात आले आहे. सभासदांना १५% पेक्षा लाभांश जास्त देता येत नाही. म्हणून संस्थेने सभासदांना वेळोवेळी भेट वस्तू व भेट पावत्या दिल्या आहेत. संस्थेच्या दशक पूर्ती वर्षानिमित्त दहा ग्रॅम चांदीचे नाणे, रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त एक हजार रु. पावती, ३१ व्या वर्षानिमित्त २५०० रुपयांचा धनादेश, ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळ्या निमित्त कृतज्ञता भेट म्हणून एक हजार रुपयांची पावती देण्यात येते. असे उपक्रम संस्थेने वेळोवेळी राबविले आहेत.

यावेळी लाभांश स्वीकारल्यानंतर उपस्थित सभासद नितीन गुजराथी, अनिल गुरावे, ॲड. रामबाबू खंडेलवाल, राजेश डागा, अजय पंजाबी, ॲड.समीर सोनी, श्यामा मंत्री, शशिकला सोनी आदिंनी मनोगत व्यक्त करुन समाधान व्यक्त केले. यावेळी कुमार आपटे यांनी संस्थेची अर्थिक माहिती दिली. सूत्रसंचालन मीरा मुळे यांनी केले. व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू यांनी आभार मानले.

# 'समता फाऊंडेशन'तर्फे १९ ऑक्टोबरला अहिल्यानगरमध्ये मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

नगर – राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रमांतर्गत समता फाउंडेशन, एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय पुणे आणि अलनूर आय केअर व मखदूम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे तन्वीर चष्मावाला यांनी सांगितले. हे शिबिर १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत अलनूर आय केअर, बडी मरियम मस्जिद जवळ, मुकुंदनगर, नगर येथे होणार आहे.शिबिरात पात्र रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून त्यांना योग्य ते सल्ला दिला जाणार असून, मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची शस्त्रक्रिया एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय पुणे येथे पूर्णपणे नि:शुल्क केली जाणार आहे. तसेच शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना ने–आण सुविधा व राहण्याची व्यवस्था देखील नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांनी आपले आधारकार्ड व रेशनकार्ड सोबत आणण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या शिबिरामुळे परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व नेत्ररोगांनी त्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, समाजात आरोग्य जागरुकतेचा संदेशही पोहोचेल, असा विश्वास समता फाउंडेशन आणि मखदूम सोसायटीने व्यक्त केला आहे. अधिक माहिती साठी व नाव नोंदणीसाठी ०९७६६४ ४०६३२ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन तन्वीर चष्मावाला यांनी केले आहे.



चितांबर विद्यालयात आकाशकंदील बनवा कार्यशाळा पार पडली.

# चितांबर विद्यालयात आकाशकंदील बनवा कार्यशाळा

नगर – नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात. यावेळी दीपावली सणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी आकाश कंदील बनवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांच्या कल्पनेतून माजी विद्यार्थिनी व कलाकार सौ. प्राची वराडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक वस्तूंपासून आकर्षक आकाश कंदील बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यालयातील सुमारे शंभर विद्यार्थ्यांनी सुंदर आकाश कंदील तयार केले.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी पर्यवेक्षिका मंदा शिंदे व कलाशिक्षक अरुण इघे यांनी परिश्रम घेतले.

# केडगावच्या अंबिका विद्यालयाच्या नूतन इमारतीचे १९ ऑक्टोबरला शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन



नगर – रयत शिक्षण संस्थेच्या श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालय, केडगाव (देवी) येथील विद्यालयाच्या नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ १९ ऑक्टोबरला दुपारी १ वाजता संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी हे राहणार आहेत.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात यासाठी सन १९६९ मध्ये रयत शिक्षण संस्थेने केडगाव गावठाण परिसरात ही शाळा सुरू केली होती. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्यामुळे जुनी इमारत अपुरी पडत होती. विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन नगर पुणे महामार्ग लगत असलेल्या मोती नगर परिसरात नवीन अत्याधुनिक स्वरूपाची दुमजली इमारत उभारण्यात आली आहे. सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च करून या ठिकाणी सुमारे वीस खोल्या काढण्यात आल्या आहेत. यामध्ये वर्गखोल्या, अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा संगणक कक्ष, एआय प्रशिक्षण केंद्र अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी खासदार निलेश लंके, आमदार संग्राम जगताप, आमदार रोहित पवार, आमदार आशुतोष काळे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, पद्मश्री पोपटराव पवार, नगर बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, संस्थेचे सचिव विकास देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सर्वांनी या कार्यक्रमात उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी केले आहे.

# दिवाळीच्या मनपसंत खरेदीसाठी अमेय कॉस्मेटिक्स

नगर – चौपाटी कारंजा येथील अमेय कॉस्मेटिक्समध्ये महिलांबरोबरच पुरुषांसाठीचीही सौंदर्यप्रसाधने उपलब्ध असल्याची माहिती दालनाचे संचालक व मालक निखिल रसाळ यांनी दिली. या वातानुकूलित आलिशान दालनामध्ये लॉरेल, गार्निआर, लॅक्मे, अयूर, नायका, लोटस, ममा अर्थ, डॉट ॲण्ड की, के ब्युटी, पिलग्रिम, पाँड्स, यार्डली, प्लम या नामांकित कंपन्यांची विविध सौंदर्यप्रसाधने आहेत. लिपस्टिक्स, हेअर कलर, नेल पेंट याचबरोबर डिओडोरंट्स आणि परफ्यूमची वैविध्यता येथे आढळते. त्याचबरोबर नथ, बुगडी, कानाचे वेल, मोहन माळ, नेकलेस, कोल्हापुरी साज, जयपुर ज्वेलरी, झुमके, वेस्टर्न इयररिंग्ज, बँगल्स खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होते.






निखील रसाळ

दिवाळीसाठी नायका आणि के ब्युटी या कंपनीच्या सौंदर्यप्रसाधनांवर दिवाळी ऑफर सुरू असल्याचे निखिल रसाळ म्हणाले.नुकतेच अमेय कॉस्मेटिक्स या दालनाचे नूतनीकरण करण्यात आल्याचे रसाळ यांनी सांगितले. सर्व ब्रँडेड कंपन्यांची विविध सौंदर्यप्रसाधने अमेय कॉस्मेटिक्स मध्ये उपलब्ध आहेत.

# रोटरी क्लब व न्यू आर्टस् कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हिमोग्लोबिन तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर प्रियदर्शनी आणि न्यू आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हिमोग्लोबिन तपासणी व रक्तदान शिबिराचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. शेवगाव येथील न्यू आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज शेवगाव यांच्या हॉलमध्ये हे शिबीर झाले. हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचा कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी होते त्यांना डॉक्टरांनी आहाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच रक्तदान शिबिरालाही प्रतिसाद मिळाला. यावेळी ५४ बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले.




रोटरी क्लब आणि न्यू आर्टस् कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हिमोग्लोबिन तपासणी व रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करताना रक्तदाते.

रोटरी प्रियदर्शनी अनेक वर्षे सामाजिक आरोग्य सेवेत अग्रेसर आहे अशा सामाजिक उपक्रमांची परंपरा राखण्याचे व तो वारसा पुढे चालू ठेवणे हे रोटरी प्रियदर्शनीचे कर्तव्यच आहे अशा शब्दात प्रेसिडेंट अनुराधा आठरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कॉलेजचे प्रिन्सिपल कुंडे सर यांनी रोटरी प्रियदर्शनी चे कौतुक करून भविष्यातही असेच कार्य करत राहण्यासाठी शुभेच्छा दिला.

रोटरी प्रियदर्शनीतर्फे प्रिन्सिपल सरांचा कुंडे सरांचा पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी शेवगाव रोटरीचे लड्ढा सर, प्रेसिडेंट युसुफ पठाण, रोटरियन काटे यांच्यासह शेवगाव रोटरीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

# अभ्यासाबरोबर खेळणे विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावते

## रामकिसन देशमुख यांचे प्रतिपादन; डॉ.पाऊलबुधे विद्यालयात क्रीडा खेळाडू विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ

नगर – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासच नव्हे, तर मैदानी खेळांचीही तेवढीच गरज आहे. खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, त्यांनी यशस्वी भविष्याची पायाभरणी होते, असे मत सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकिसन देशमुख यांनी व्यक्त केले. वसंत टेकडी येथील डॉ. पाऊलबुधे विद्यालयात आयोजित क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते.



डॉ. पाऊलबुधे विद्यालयातील क्रीडा क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, प्राचार्या विजया नवले, मुख्याध्यापिका अनिता सिद्दम शिक्षक वृंद विद्यार्थी आदी (छाया – विजय मते)

या कार्यक्रमात राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत निवड झालेल्या श्रीराज इंगळे, धावणे स्पर्धेत ऋतुजा फलके, तर कराटे स्पर्धेत सुप्रिया सारूक यांनी मिळविलेल्या यशाबद्दल श्री. देशमुख, श्री.भोईटे यांचे हस्ते या खेळाडू विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्यासोबत संस्थेचे खजिनदार दादासाहेब भोईटे, प्राचार्या विजया नवले, श्रीनाथ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता सिद्दम, क्रीडा शिक्षक दिपक परदेशी, मंगल कदम, क्रांती, गायकवाड, नंदा घुले, संध्या यादव, सुनिता त्रिंबके, पूनम खडके, अर्चना दाते, अशा गावडे, वैशाली शेळके, रोहिदास चौरे, विष्णू मगर, वैशाली वाघुले तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद आणि पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन डॉ. पाऊलबुधे विद्यालयाने केले होते. विद्यार्थ्यांनी विविध जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये आपल्या दमदार कामगिरीने शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

श्री.देशमुख पुढे म्हणाले, शालेय जीवनात खेळ हा केवळ विरंगुळा नसून, तो एक जीवनशैली आहे. खेळामुळे मानसिक तणाव दूर होतो, सामाजिक एकजूट निर्माण होते, आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात. क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेताना जिंकणे किंवा हरणे हे दुय्यम ठरते, खरी गोष्ट असते ती म्हणजे प्रयत्नशीलता आणि चिकाटी. हे गुण विद्यार्थ्यांना आयुष्यभर उपयोगी पडतात. आपल्याला अधिकारी, कर्तबगार नागरिक घडवायचे असतील, तर त्यांच्या अंगी शिस्त, सहकार्य, चिकाटी, आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या खेळांना पाठिंबा दिलाच पाहिजे. खेळ आणि शिक्षण यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे, असेही देशमुख यांनी नमूद केले. सेवा शिक्षण प्रसारक मंडळाची नेहमीच ही भूमिका राहिली आहे की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. या दृष्टीने आमची संस्था खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सुविधा देण्यासाठी कटीबद्ध आहे. प्रशिक्षण, साहित्य, वेळोवेळी मार्गदर्शन हे आमचे कर्तव्यच आहे. खेळामुळे आरोग्य सुधारते, जीवनशैली शिस्तबद्ध बनते आणि हेच विद्यार्थ्यांना जीवनाच्या कठीण टप्प्यांवर उभे राहण्यास मदत करते.

खजिनदार दादासाहेब भोईटे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. खेळ हे केवळ शरीराच्या तंदुरुस्तीपुरते मर्यादित नसून, त्याचा मानसिक स्वास्थ्यावरही सकारात्मक परिणाम होतो. बदलत्या हवामानात नियमित मैदानी खेळांमुळे विद्यार्थी आजारांना बळी पडत नाहीत. योगासन, सूर्यनमस्कार, खो–खो, कबड्डी, धावणे, अशा खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद निर्माण होतो. या खेळाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी शासकीय सेवा मिळवून आपले जीवन उभारले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, साई पाऊलबुधे संचालक मंडळातील सर्व सदस्य यांनी अभिनंदन करत आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन दिपक परदेशी यांनी केले. भारती थोरवे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य विजया नवले व संपूर्ण शिक्षकवृंद यांनी अथक मेहनत घेतली. डॉ. पाऊलबुधे विद्यालयाने क्रीडा क्षेत्रातील परंपरा पुढे चालवत विद्यार्थ्यांच्या यशाचा उज्ज्वल इतिहास यंदाही कायम ठेवला.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटीलच्या गौरी दळवी हिस राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत रौप्य पदक

नगर – शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयातील गौरी कांतीलाल दळवी हिने राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत द्रितीय क्रमांक पटकाविला. छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच पार पडलेल्या १६ ते१८ किलो वजन गटातील राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा २०२५–२६ मध्ये गौरीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन द्रितीय क्रमांकाचे रौप्य पदक पटकावले. या स्पर्धेत राज्यभरातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.



शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयातील गौरी कांतीलाल दळवी हिने राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत द्रितीय क्रमांक पटकाविला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित पुणे विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत तिने सुवर्णपदक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. तर राज्य स्पर्धेतही तिने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल शाळेच्या वतीने तिचा मुख्याध्यापिका छाया काकडे यांनी सत्कार केला. दळवी हिने तायक्वांदो खेळातून शहराचे व शाळेचे नाव राज्यात उंचावले असल्याची भावना काकडे यांनी व्यक्त केली.

गौरी दळवी हिने मिळवलेल्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार समितीचे अध्यक्ष आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, माजी सचिव शिवाजीराव भोर, जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे, ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक कळमकर, शौकत तांबोळी, विभागीय अधिकारी नवनाथजी बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, कैलासराव मोहिते तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया काकडे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर, मार्गदर्शक तायक्वांदो प्रशिक्षक व क्रीडा विभाग प्रमुख प्रदीप पालवे, संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दीप गार्ड पावर सिस्टम

सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करून मिळेल. बॅटरी वॉटर टाकून मिळेल.

**घरपोहोच सेवा**

जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो

**9260000613**

---

## २२०० स्क्वे.फुट प्रशस्त जागा भाड्याने देणे

बँका, ऑफिसेस इ.साठी पार्किंगची सोय, वगैरे सर्व आहे

**8080882075**

---

## शेड भाड्याने देणे

केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट येथील 2400 स्क्वे.फूट शेड + 6000 स्क्वे.फूट ओपन एरिया भाड्याने देणे आहे.

**9822333780**

---

## विकणे आहे

तवलेनगर येथे रु.55,00,000 लाखामध्ये 6 रुमचा RCC स्ट्रक्चर 1800 स्क्वे.फुट NA प्लॉटवर

For SALE

**9822392282**

---

## आता आपल्या घराचं स्वप्न होईल साकार...

**गुरू-आशिष** रेसिडेन्सी
२ बी.एच.के. फ्लॅट्स
३६.५०-३७.५० लाखां पर्यंत
साईटचा पत्ता : पंचरंग गल्ली, बागडपट्टी रोड, तोफखाना, अहिल्यानगर.

**गुरूदत्त** रेसिडेन्सी
कमर्शियल ऑफीसेस
2 BHK फ्लॅट
साईटचा पत्ता : मैदान आर्ट समाचार प्रेस समोर, लक्ष्मीबाई कारंजा जवळ, अ.नगर.

**बाप्पा** रेसिडेन्सी
2 BHK स्पेशियस फ्लॅट
साईटचा पत्ता : आम्रपाली गार्डन समोर, गुलमोहर रोड, अहिल्यानगर.

9326221864
7776862345

NAVLE BUILDERS
Promoters | Builders | Developers
Ahilyanagar | Chattrapati Sambhaji Nagar

ऑफसचा पत्ता : गुरूपद्मा अपार्टमेंट्स, गुजर लेन, अहिल्यानगर.(0241)2329464

---

## बाई/मुलगी पाहिजे

सारसनगर येथे कामासाठी बाई/मुलगी पाहिजे
(वय १८ ते ४५)
वेळ : सकाळी ९ ते संध्या. ९

**8888576576**

---

अस्सल शुध्द तुपातील मिठाईयाँ.. नमकीन..

## दिवाळी फराळ

विक्री आता दोन ठिकाणी

आता शहरात सुध्दा उपलब्ध -
अमृत किराणा शेजारी, घुमरे गल्ली, अ.नगर
साईनगर, ज्येष्ठ नागरिक भवन समोर, विनायकनगर रोड, अ.नगर.

The Annapurna Foods & Events

दि अन्नपुर्णा फुडस् अँड इव्हेन्टस्

M.878899 3545
989090 4818

शुभ दिपावली

---



The Salvation Army
Evangeline Booth Hospital, Ahilynagar

**ADMISSION OPEN FOR ACADEMIC YEAR 2025-2026**

THE Lady Colville School Of Nursing
(General Nursing and Midwifery)
Qualification Required: 12th Pass

**REQUIREMENT OF TUTOR (FEMALE)**

Qualification for Tutor: B.SC Nursing/ PBBSC Nursing with Registration
Last date of Resume Submission: 25/10/2025

**Contact: 0241-2345059, 9552751941**

---

Recognized by the Government of Maharashtra and affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik.

## Rashtrasant Janardhan Swami College of Nursing

(Affiliated to MUHS, Nashik)
A/P Kokamthan, Mumbai Nagpur Highway, Taluka Kopargaon. Dist - Ahilyanagar
Contact No. 9961133013, 7907565939 https://nursing.rjsgi.com/ E-mail : rajaswanursing@gmail.com

### ADMISSION TO B. Sc. NURSING A.Y. 2025-2026

SCHEDULE FOR INSTITUTE LEVEL ROUND

Ref. No: MED-1025/C.R.No.15/B.Sc. Nursing CAP-4 & Inst. Round/3087 Dated 06/10/2025

Seat Matrix

| SC | ST | VJ-A | NT-B | OBC/SBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 1 | 5 | 8 | 10 | 8 |

| Sr. No. | Activity | Dates |
|---|---|---|
| 1 | Publication of Seat Matrix & Provisional Eligible List | 17/10/2025 |
| 2 | Submission of Application (in person) | 18/10/2025 – 20/10/2025 (up to 5:30 PM) |
| 3 | Display of Merit List, Selection List-1 & Wait List | 20/10/2025 (by 6:30 PM) |
| 4 | Physical Joining with original documents, filling status retention & Fee Payment for Selection List-1 | 24/10/2025 – 26/10/2025 (up to 5:30 PM) |
| 5 | Display of Joined List, Selection List-2 & Wait List | 26/10/2025 (by 6:30 PM) |
| 6 | Physical Joining with original documents, filling status retention & Fee Payment for Selection List -2 | 27/10/2025 – 29/10/2025 (up to 5:30 PM) |
| 7 | Publication of Residual Vacancy | 29/10/2025 (by 6:30 PM) |
| 8 | Reporting of Candidates for Residual Vacancy | 30/10/2025 |
| 9 | Filling of Residual Vacancy (as per merit) | 30/10/2025 (from 2:30 PM) |
| 10 | Cut-off Date for Admission (as per INC) | 31/10/2025 |

Principal
RJS College of Nursing, Kopargaon

---

## खास दिवाळीसाठी नमकिन व मिठाई

धनत्रयोदशी व दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

## चावंडा केटरर्स

चावंडा स्पेशल लवंग शेव, मोहन थाळ, काजु गजक, ड्रायफ्रुट कसाटा

प्रोप्रा. मुरली महाराज : 9823030554 । रवि उपाध्ये : 8412902554

चावंडा सदन, अभिनव रेसिडेन्सी, विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

---

## दिवाळी ऑफर

दिवाळीत मुलीला, पत्नीला भारी ड्रेस घ्यायचाय... भाऊबिजेला बहिण भाची येणार यांना भारी ड्रेस घ्यायचाय...लग्नसमारंभात, कार्यक्रमात घालण्यासाठी स्व:ताला भारी ड्रेस पाहिजे आणि तेही कमीत कमी किंमतीत ... तर मग चला फक्त आणि फक्त मयुरी लेडिज मॉल मध्ये..भरपूर व्हरायटी आणि तेही ऑनलाईन व होलसेल पेक्षा कमी किंमतीत...

लहान मुलींपासून ते मोठ्या मुलींपर्यंत व महिलासाठी साईज १६ ते ४२ व पुढे ब्रँडेड व हायक्वॉलीटी मध्ये - फ्रॉक, शरारा-गरारा, नायरा पॅटर्न, जॅकेट पॅटर्न, वन पिस, टू पिस, थ्री पीस, घागरा, स्कर्ट टॉप पॅटर्न, पार्टीवेअर ड्रेस

* मोठ्या मुलींचे रु. ३०००/- ते रु. ४०००/- पर्यंतचे ड्रेस फक्त रु. ५००/- ते रु. १०००/- पर्यंत
* महिलांचे रु. ३०००/- ते रु. ४०००/- पर्यंतचे ड्रेस फक्त रु. १५००/- ला एक व रु.२०००/- ला दोन
* लहान मुलींचे रु.१५००/- ते रु.२०००/- पर्यंतचे फ्रॉक व ड्रेस फक्त रु. ३५०/- ते रु. ७००/- पर्यंत

रु.१०००/- पेक्षा जास्त रक्कमेची खरेदी करा व लकी ड्रॉ कुपन भरुण मिळवा आकर्षक बक्षिसे

लहान मुलांचा बाबासुट रु.१५००/-चा फक्त रु.५५०/-मध्ये

वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत

सर्वांसाठी स्वेटर्स व जर्किन्स् | मर्यादित स्टॉक

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
## मयुरी लेडिज मॉल

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

---

।।श्री।।

## सुरक्षा तुमची... सर्व्हिस आमची....

CCTV Camera Set **12999/- फिटिंगसह**

घर, दुकाने, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज

**द गोल्डन एंटरप्रायजेस**
दिल्लीगेट, अहिल्यानगर
संपर्क-
**7304099919**



नियम व अटी लागु*

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः अहिल्यानगर महानगर पालिका (अहमदनगर) येथील मुकुंदनगर भागातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकती या आमचे अशिलाचे वडिलोपार्जित मिळकती असून परिशिष्ठ मधील नमूद रो.हौ ब्लॉक नं. २३ ही आमचे अशिलांची आई हलीमाबी अब्दुल रज्जाक शेख यांचे नावे होते तसेच रो.हौ ब्लॉक नं. २२ ही आमचे अशिलांचे वडील अब्दुल रज्जाक रहीम शेख यांचे नावे होते. त्यांचे मृत्यू पश्चात त्यांना वारस दोन मुले नामे १) शेख अब्दुल गफ्फार, २) शेख अब्दुल जब्बार व मुली,३) शेख रहिमुन्नीसा अब्दुल रज्जाक असे कायदेशीर वारस असतांना त्यांचा मुलगा जब्बार अब्दुल रज्जाक शेख याने सदर मिळकती बेकायदेशीररित्या स्वतःचे नावे करून घेतलेली आहे. वास्तविक सदर मिळकतीमध्ये आमचे अशील व इतर वारस यांचा हक्क व अधिकार आहे. असे असतांना आमचे अशिल व चुलते जबार अब्दुल रज्जाक शेख यांचे मध्ये मागील काही दिवसांपासून वाद निर्माण झाल्याने ते सदर मिळकत त्यांचे नावावर असल्याचा गैरफायदा घेऊन गैरहेतुने आमचे अशिलाचे अपरोक्ष सदर मिळकती विक्रीचा, हस्तांतरणाचा व्यवहार करणार असल्याचे आमचे अशिलास समजले आहे. सबब तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात कोणीही वर नमुद इसमाबरोबर खरेदी विक्री अगर कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा अगर सदर मिळकतीवर तिऱ्हाईत इसमाचा बोजा निर्माण होईल असे कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नयेत त्यास आमचे अशिलाची सक्त हरकत आहे. इतपर कोणीही व्यवहार केल्यास संबंधीतास सदर मिळकतीचा ताबा मिळणार नाही व सदरचा व्यवहार हा आमचे अशिल व त्यांचे ताब्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिद्धीस दिली.

**परिशिष्ट (मिळकतीचे वर्णन)**

जिल्हा तुकडी अहमदनगर पोट तुकडी तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील सर्व्हे नं. ३४१/३ मधील प्लॉट नं. ३० चे एकूण क्षेत्र २१६ चौ. मी. यापैकी सदर प्लॉटमध्ये मंजूर प्लान प्रमाणे लोड बेरिंग मध्ये बांधकाम केलेले शाहीद सहकारी गृहनिर्माण संस्था या सोसायटी मधील १) रो.हौ. ब्लॉक २२ क्षेत्र ३६.९६ चौ.मी व २) रो.हौ ब्लॉक २३ क्षेत्र ४५.९७ चौ.मी त्यावरील बांधकाम सहित अशी संपूर्ण मिळकती त्यातील लाईट मिटर, पाण्याचे कनेक्शन तसेच वागवहिवाटीचे हक्कासह काही एक राखुन न ठेविता.

तारीख १८.१०.२०२५
अहमदनगर.

**शेख अब्दाल सलीम**
ॲडव्होकेट
मुकुंदनगर, अहमदनगर, मो : ९५५२७००४०४

---

पान न.
नि.नं.७

ॲड.लतीफ शेख
तारीख : १६-१०-२०२५

## जाहीर नोटीस

मे. सिव्हील जज्ञ साहेब ज्यु.डि.श्री. वाघमारे साहेब,ता.पाथर्डी जि अहमदनगर यांचे न्यायालयात, दि.चौ.अ.नं.१०६/२०२५

**अर्जदार : शरफुद्दीन कमरुद्दीन शेख वगैरे.**
**सामनेवाले : कोणीही नाही**

दिवाणी चौकशी अर्ज नं : १०६/२०२५ निशाणी ७, या नोटीसीध्दारे कळविणेत येते कि अर्जदार १) शरफुद्दीन कमरुद्दीन शेख २) शमशुद्दीन कमरुद्दीन शेख ३) रुक्साना नसीर खान ४) शबाना शब्बीर शेख ५) नजमाबी कमरूद्दीन शेख, सर्व रा.अहमदनगर, ता.जि.अहमदनगर येथे राहतात. अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील व नं-५ चे पती कमरूद्दीन बहादुर शेख हे होते.ते दिनांक ०५-०७-२००३ रोजी आजारपणामुळे अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. एकत्रित राहत असतांना ते मयत झालेले आहेत. सदर मयत कमरूद्दीन बहादुर शेख यांना कायदेशीर वारस अर्जदार नं-१ ते ५ हेच आहेत. वरील मयत कमरुद्दीन बहादुर शेख यांना सदर अर्जदार नं.१ ते ५ यांच्याशिवाय दुसरे कोणीही वारस नव्हते व नाही. मयताचे वारस असलेबाबत का.तलाठी ग्रामसेवक यांनी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची मागणी केली म्हणून मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज अर्जदारांनी मे कोर्टात दाखल केला आहे. तरी याबाबत कोणाची काही तक्रार हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १ महिन्याचे आत किंवा तारीख २९-११-२०२५ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे. त्यानंतर कोणाची तक्रार चालणार नाही, याची नोद घ्यावी. आज तारीख १६/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

तयार करणार.
वरिष्ठ लिपीक

सहाय्यक अधीक्षक दिवाणी न्यायालय
पाथर्डी

---

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

### जाहीर कोटेशन नोटीस

सन २०२५-२६
रक्तपेढी विभाग, दि.१७/१०/२०२५

| कामाचे तपशील | अंदाजे खर्च |
|---|---|
| रक्तपेढी विभागाकडील रक्त पिशवी Cultur Report pathology Lab मधून तपासणी करून देणेकामी. | एक रक्त पिशवी तपासणी कामी अंदाजे रक्कम रु.१,५००/-खर्च अपेक्षित |

टीप : प्रसिध्दी दिनांक : १७/१०/२०२५ पासून ०७ दिवसांत रक्तपेढी विभागाकडे दोन लिफाफ्यात सादर करणेबाबत..

सही/-
उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रसिध्दी विभाग :
जा.क्र.३८४/दि.१७/१०/२०२५

---

दिनांक : 17 ऑक्टोबर 2025 ते 20 ऑक्टोबर 2025
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

**JOLLY LLB 3**
01:45 PM
07:15 PM

**Sunny Sanskari Ki Tulsi Kumari**
04:45 PM
10:15 PM

**Kantara : A Legen**
08:30 AM I 09:15 AM
10:30 AM I 11:45 AM
12:30 PM I 03:00 PM
03:45 PM I 06:15 PM
07:00 PM I 09:30 PM
10:15 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

Available on bookmyshow — CONNPLEX SMART THEATRE

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

---

## ग्रामपंचायत गोंडेगाव ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर

### संक्षिप्त निविदा नोटीस,सन २०२५/२६

खालील कामांच्या मोहर बंद ब-१ निविदा,दोन लीफापे पद्धतीनुसार मा.सरपंच,ग्रा,पं यांच्यावतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे.या कामांच्या कोऱ्या निविदा ग्रा.पं गोंडेगाव या कार्यालयात दि.१८/१०/२०२५ ते २८/१०/२०२५ रोजी पर्यंत (शासकीय सुट्टी वगळून ) ग्रा.पं गोंडेगाव कडे निविदा फी भरल्यास देण्यात येतील मोहर बंद निविदा ग्रा.पं.गोंडेगाव कार्यालयात स्विकारून दि.२९/१०/२०२५ रोजी सकाळी ११ वा.उघडण्यात येतील.

| अ.नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम २% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदेचा प्रकार | कोऱ्या निविदाची किंमत | नोंदणीकृत ठेकेदाराचा वर्ग | सुरक्षा अनामत २ % ठेकेदाराच्या वर्गानुसार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प.प्राथमिक शाळा प्रयोगशाळा खोली बांधणे | १९२८६२/- | ३८५७/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | सु.बे. | ३८५७/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| २ | मागासवर्गीय वस्त्यासाठी सुशोभिकरण करणे | १७९९८०/- | ३५९९/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | खुला | ३५९९/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| ३ | गावांतर्गत व वाड्या वस्त्यावरील रस्ते मजबुतीकरण करणे | ८५९४३/- | १७१८/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | मजूर संस्था | १७१८/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| ४ | मारुती मंदिर ते जि.पं शाळा रस्ते मजबुतीकरण करणे | ११४३२०/- | २२८६/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | खुला | २२८६/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| ५ | गावठाण अंगणवाडी शौचालय दुरुस्ती पिण्याचे पाणी व्यवस्था /वीज कनेक्शन /सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे | १२१५२३०/- | २४३०/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | सु.बे. | २४३०/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| ६ | गाव अंतर्गत आर.ओ. फिल्टर व चिलिंग प्लांट बसविणे,देखभाल दुरुस्त करणे | १२७३२५/- | २५४६/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | खुला | २५४६/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |
| ७ | गावांतर्गत बंधिस्त गटार/ ड्रेनेज बांधणे,देखभाल दुरुस्त करणे | २५४२००/- | ५०८४/- | ६ महिने | बी-१ | ५९०/- | सु.बे. | ५०८४/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ (ग्रा.पं.स्तर) |

टीप :-१) वरील कामांच्या निविदा कोणतेही कारण न दाखविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच, ग्रा.पं.गोंडेगाव, ता.श्रीरामपूर यांनी राखून ठेवला आहे.
२) ठेकेदाराने कोऱ्या निविदासंचाचे अर्जासोबत अद्ययावत नोंदणी दाखला पॅन क्रमांक व जीएस टी क्रमांक वर्कडनच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.
३) कामाचा व कामावरील मजुराचा शासकीय विमा उतरविणे ठेकेदारास बंधन कारक राहील.
सरपंच/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गोंडेगाव ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर.

(रामदास जाधव) ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, गोंडेगाव,ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय, गोंडेगाव,ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

---


या दिवाळीत करा तुमच्या चित्रपट अनुभवाला आणखी खास!

Cinélife MINIPLEX

## CineLife दिवाळी ऑफर!

Box Office वरुन तिकीट बुक करा आणि मिळवा
**FREE FOOD COUPON!***

T&C Apply



Show Timings साठी QR कोड स्कॅन करा

**बुकिंगसाठी संपर्क करा :**
**9881300400, 0241-2346000**
नगर कॉलेज जवळ, झुडीओच्या वरती, अ.नगर



शुभदीपावली

रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळू दे,
लक्ष्मीच्या सोनेरी पावलांनी
तुमच्या घरी सुख-समृद्धी येऊ दे...

बँकेचे भागधारक, खातेदार, ठेवीदार व हितचिंतक सर्वांना
दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

सुनिल पुराणिक — मुख्य कार्यकारी अधिकारी | अमित मुथा — व्हा. चेअरमन | हस्तीमल मुनोत — चेअरमन

संचालक मंडळ

अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी
सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, संजय चोपडा, किशोर मुनोत, संजीव गांधी,
श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, सुभाष बायड
जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) * प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी)
नितीन भंडारी (जॉईंट सीईओ)
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट – संजीव गांधी (चेअरमन), राजेश झंवर, पेमराज बोथरा,
सीए प्रवीण कटारिया व सर्व सेवक वृंद

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. (शेड्यूल्ड बँक)
मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ –२३२२२२२

कर्जावरील आकर्षक व्याजदर

| | | | |
|---|---|---|---|
| • व्यापारी व उद्योजकांसाठी नजर गहाण कर्ज • एस.एस.आय. नजरगहाण कर्ज/टर्म लोन • आडत कॅश क्रेडिट कर्ज | 8.50*% व्याजदर | • एम.एस.एम.ई. (मॅन्युफॅक्चर) कर्ज – | 8.00*% व्याजदर |
| • एस.एस.आय. मशिनरी कर्ज एस.एस.आय. बिल्डींग कर्ज | 9.50*% व्याजदर | • मशिनरी कर्ज | 10.50*% व्याजदर |

ठेवीवरील आकर्षक व्याजदर
१ वर्षापेक्षा जास्त २ वर्षा पर्यंत 7.50%
ज्येष्ठ नागरिक 7.75%

* नियम व अटी लागू

कार लोन 8*% व्याजदर | हाऊसिंग लोन (महिलांसाठी) 6.50*% व्याजदर | हाऊसिंग लोन 7*% व्याजदर

बँकेच्या विविध सुविधा – * नेट बँकींग * मोबाईल बँकींग * युपीआय * एटीएम * आरटीजीएस, एन.ई.एफ.टी. इ. सुविधा उपलब्ध...

शाखा : अ.नगर- दाळमंडई । मार्केट यार्ड । कापडबाजार । गुलमोहर रोड । चितळे रोड । एम.आय.डी.सी । तारकपुर
जामखेड । छ.संभाजीनगर । पुणे । श्रीगोंदा । शेवगाव । पाथर्डी । सोनई । घोडनदी । कडा । छ.संभाजीनगर (मोंढा)। नारायणगाव





झेरॉक्स मशीन ने थकवले?



तर कॉल करा


Since 1996 (TM)
R B ELECTRONICS
स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्स मागे, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9822595890
9922223434



दीपावली खरेदी उत्सव...!

सण आनंदाचा, मंगल्याचा,
नटण्याचा, साज शृंगाराचा...
अमेयतील खरेदी उत्सवाचा...!

लॉरेल, गर्नियर, लॅक्मे, डॉट अँड की, के ब्युटी, अयुर, ममा अर्थ, नायका, निव्हिआ, पिलग्रिम, यार्डली, पोंड्स, प्लम या व अन्य विविध ब्रँडस कंपन्यांचे स्किन केअर व मेकअपच्या उत्पादनांचे दालन आणि नामांकित कंपन्यांचे डिओ, परफ्यूमस् व अत्तर मिळण्याचे विश्वसनीय दालन....





। नथ । बुगडी । ठुशी । कानाचे वेल । मोहनमाळ । कोल्हापुरी साज
तसेच । जयपुरी ज्वेलरी । झुमके । वेस्टर्न इयररिंग्स । बँगल्स

GARNIER | Olivia | SWISS BEAUTY | MATRIX | BIOTIQUE | REVLON PROFESSIONAL | O3+ | LAKMÉ | LOTUS HERBALS | L'ORÉAL | MAYBELLINE NEW YORK | SUGAR | Himalaya | KAY ब्युटी | NIVEA | WELLA PROFESSIONALS | L'ORÉAL PARIS | Ayur | mamaearth | YARDLEY LONDON

अमेय कॉस्मेटिक्स
चौपाटी कारंजा, सोनी शोरूम समोर, अहिल्यानगर मो. ९८६०४५४११०



SONY

BRAVIA
CINEMA IS COMING HOME



S.S. Rajamouli
Celebrated Filmmaker

BIG SAVINGS with GST BENEFITS & FESTIVE OFFERS

Advanced AI Powered by XR

SPECIAL FESTIVE OFFERS*

3 YEARS WARRANTY*

INSTANT CASHBACK UP TO RS.25,000/-* *Applicable on selected models only.

1 EMI FREE* *Applicable on selected models

TV + SOUNDBAR COMBO OFFER
SAVE UPTO Rs.69,990/-* | BUY NOW AT Rs.2,995/-*
*Conditions apply

BRAVIA

BRAVIA 5 NEW
Big on entertainment, easy to love.
XR Mini LED
SPECIAL OFFER* — INSTANT CASHBACK UP TO Rs.25,000/- — Buy now @ Rs.2,995/- per month
Available Sizes: • 248cm (98) • 215cm (85) • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55)
Range starts from Rs.1,33,660/-

BRAVIA 3
Rich Color, Immersive Sound
X1 4K HDR Processor
SPECIAL OFFER* — INSTANT CASHBACK UP TO Rs.15,000/- — Buy now @ Rs.1,849/- per month
Available Sizes: • 215cm (85) • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55) • 126cm (50) • 107cm (43)
Range starts from Rs.66,340/-

BRAVIA 2II NEW
Life, upscaled. In 4K.
X1 4K Processor
SPECIAL OFFER* — INSTANT CASHBACK UP TO Rs.7,500/- — Buy now @ Rs.1,849/- per month
Available Sizes: • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55) • 126cm (50) • 107cm (43)
Range starts from Rs.44,190/-

SOUNDBAR

HT-A3000 + SW3 + RS3S
Real 5.1ch Home Theatre with Wireless Rear Speakers
SPECIAL OFFER* — INSTANT CASHBACK UP TO Rs.6,000/- Off — BUY NOW AT Rs.4,995/-
GET Rs.35,990/-
MRP Rs.1,35,970/- | Offer Price Rs. 80,980/-

BRAVIA Theatre System 6 NEW
Real 5.1ch Dolby Atmos Soundbar with Wireless Rear Speaker
SPECIAL OFFER* — COMBO OFFER UP TO Rs.3,000/- Off
1000w
MRP Rs.64,990/- | Offer Price Rs. 49,990/-

HT-S40R
Real 5.1ch soundbar with wireless rear speakers
SPECIAL OFFER* — INSTANT CASHBACK UP TO Rs.2,000/- Off — BUY NOW AT Rs.1,295/-
MRP Rs.34,990/- | Offer Price Rs. 22,990/-

Finance offers powered by: pine labs | Paytm EMI
ATTRACTIVE CREDIT CARDS FINANCE OPTIONS*: AMERICAN EXPRESS | BOBCARD | HDFC BANK | HSBC | SBI card | YES BANK
ATTRACTIVE PAPER FINANCE OPTIONS*: BAJAJ FINSERV | HDB | IDFC FIRST Bank | kotak

Visit your nearest store for the entire range of Sony products and accessories | Sony Center The Ultimate Sony Experience | Sony Center is now Online www.shopatSC.com

Sony Center - Biggest Showroom
Chaupati Karanja, Delhi Gate, Ahilyanagar. Cell - 9890000234 / 9890000093